रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ११२
www.ramprahar.com

बुधवार, ८ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


अंतरंग

दुचाकीवरून येऊन मोबाईल चोरणारी टोळी गजाआड/३

महावितरणच्या बेजबाबदारपणामुळे पेणमध्ये तरुणाचा दुर्दैवी मृत्यू/५

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राचे खो-खो संघ उपांत्य फेरीत/८

## मॅक्सवेलचे द्विशतक; ऑस्ट्रेलियाचा अफगाणिस्तानवर विजय



**मुंबई** : ग्लेन मॅक्सवेलच्या झुंजार द्विशतकाच्या जोरावर वर्ल्डकपमध्ये ऑस्ट्रेलियाने अफगाणिस्तानवर विजय मिळविला. यासह हा संघ उपांत्य फेरीत दाखल झाला आहे. प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने निर्धारित ५० षटकांमध्ये पाच बाद २९१ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने ४६.५ षटकांत तीन गडी राखून विजयी लक्ष्य गाठले. ऑस्ट्रेलियाचे ७ फलंदाज ९१ धावांवर माघारी परतले होते आणि समोर २९२ धावांचे लक्ष्य होते. तळाच्या फलंदाजांना सोबत घेऊन हे अशक्यच होते. अफगाणिस्तानच्या गोलंदाजांची कामगिरी पाहता हा सामना ऑस्ट्रेलिया जिंकेल याची शक्यता फार कमी होती, पण मैदानात मॅक्सवेलचे वादळ घोंगावले. त्याला नीट चालताही येत नव्हते, परंतु त्याने उभ्या उभ्या सामना फिरवला. त्याने १२८ चेंडूंत २१ चौकार आणि १० षटकारांसह नाबाद २०१ धावांची शानदार खेळी केली.

# काश्मीर खोऱ्यात शिवरायांचा जयघोष

## एलओसीजवळील पुतळ्याचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण

**कुपवाडा : वृत्तसंस्था**

काश्मिरमधील कुपवाडा येथील भारत-पाक नियंत्रण रेषेजवळ (एलओसी) उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना प्रेरणादायी, उर्जादायी ठरेल, असे सांगतानाच छत्रपतींचा हा पुतळा आपल्या देशाचा तिरंगा ध्वज शत्रूच्या छातीवर फडकवण्यासाठी नेहमीच जवानांना प्रेरणा देईल. त्यांचे मनोबल उंचावत राहील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी (दि. ७) कुपवाडा येथे व्यक्त केला. पुतळा अनावरणाच्या निमित्ताने काश्मीर खोऱ्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष दुमदुमला.



आम्ही पुणेकर संस्था, ४१ राष्ट्रीय रायफल मराठा बटालियन यांच्या माध्यमातून कुपवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविण्यात आला आहे. त्याचे अनावरण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. या सोहळ्यास जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, आम्ही पुणेकर संस्थेचे विश्वस्त अभयसिंह शिरोळे, हेमंत जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी भाषणाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने केली. समोरच्या पर्वतरांगापलीकडे असलेल्या पाकिस्तामनध्ये हा जयघोष पोहचला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, अश्वारुढ पुतळ्यावरील छत्रपती शिवाजी महाराज पाकिस्तानच्या दिशेने बघत आहेत. त्यांच्या हातात तलवार आहे. महाराज येथे असल्याने शत्रू येथे पाऊल ठेवण्यास धजावणार नाही. हा पुतळा पाहून दहशतवादीही काश्मीरमध्ये घुसखोरी करण्याची हिंमत करणार नाही. ज्या ठिकाणी हा पुतळा बसवला आहे त्या ठिकाणी काही दिवसांपूर्वी मोठा खड्डा पडला होता. तेव्हा जवानांनी सुमारे १८०० ट्रक माती भरून त्या ठिकाणी पुतळ्यासाठी भक्कम पाया करण्यात आला. याचा उल्लेख करून मुख्यमंत्र्यांनी मराठा बटालियनच्या जवानांचे कौतुक केले. सातारा येथील मेजर संतोष महाडीक यांना अभिवादन करीत त्यांच्या बलिदानाची आठवणही त्यांनी सांगितली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त राज्य शासन आणि सांस्कृतिक विभागाने विविध उपक्रम राबवले. याच कालावधीत कुपवाड्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला याला मोठे महत्त्व आहे. या ठिकाणी स्मारक करण्यात येत आहे. त्यासाठी आवश्यक ते सहकार्य राज्य शासन करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. (पान २ वर..)

### जवानांसोबत साजरी केली दिवाळी

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पुतळा अनावरण कार्यक्रमाच्या ठिकाणी मराठा बटालियन असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जवानांसोबत दिवाळी साजरी करण्याचा आनंद घेतला. त्यांच्यासमवेत फराळाचा आस्वाद घेत मुख्यमंत्र्यांनी जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. तुम्ही रात्रंदिवस सीमेवर प्राणपणाने बाजी लावून देशाचे रक्षण करतात. त्यामुळे आम्ही सर्व सण-उत्सव आनंदाने साजरे करू शकतो, असे ते म्हणाले.

# मोदी सरकारच्या कल्याणकारी योजना नागरिकांच्या जीवनात आशेचे किरण

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे खारघर येथे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरोमार्फत आयोजित 'भारत सरकार : नऊ वर्षे सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाची आणि आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष' या विषयावरील मल्टीमीडिया प्रदर्शनाचे उद्घाटन मंगळवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी (दि. ७) झाले. या वेळी त्यांनी आपल्या भाषणात बोलताना मोदी सरकारच्या विविध योजना नागरिकांच्या जीवनात आशेचे किरण असल्याचे प्रतिपादन केले.



खारघर लिटिल वर्ल्ड मॉल येथे हे प्रदर्शन भरवण्यात आले असून ७, ८ आणि ९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. यात केंद्र सरकारमार्फत गेल्या नऊ वर्षांत राबविण्यात आलेल्या विविध कल्याणकारी योजना आणि उपक्रम यांच्याबाबत माहिती चित्रे आणि डिजिटल स्वरुपात दाखवण्यात आली आहेत.

प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभास नवी मुंबई टपाल कार्यालयाचे वरिष्ठ अधीक्षक नितीन येवला, नायब तहसीलदार संजय भालेराव, पनवेलच्या बालविकास प्रकल्प अधिकारी सुहिता ओव्हाळ, उद्योजक कांतीभाई पटेल, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, केंद्रीय संचार ब्युरोचे पुणे विभागाचे उपसंचालक निखिल देशमुख, प्रसिद्धी अधिकारी हर्षल आकुडे, प्रसिद्धी सहायक पी. कुमार यांच्यासह माजी नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ठाणे येथील लोककलावंत बहुद्देशीय संस्थेच्या कलाकारांनी महाराष्ट्र राज्यगीताचे सादरीकरण केले. यानंतर आमदार प्रशांत ठाकूर यांनी संपूर्ण प्रदर्शनात फेरफटका मारून आढावा घेतला. त्यांनी केंद्रीय संचार ब्युरोच्या प्रदर्शनाचे कौतुक केले. ते म्हणाले की, गेल्या नऊ वर्षांच्या कालावधीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने अनेक लोकोपयोगी आणि कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत. या योजनांचा लाभ मिळवून अनेक नागरिकांच्या जीवनात आशेचे किरण निर्माण झाले आहेत. योजनांचा अधिकाधिक लोकांना लाभ घेता यावा यासाठी केंद्रीय संचार ब्युरोच्या मल्टीमीडिया प्रदर्शनाची गरज आहे. असे प्रदर्शन सर्वत्र सातत्याने भरवण्यात यावे. याच्या मदतीने नागरिकांमध्ये शासकीय योजनांबाबत जनजागृती होऊन त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडतील.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते या वेळी परिसरातील आयुष्मान भारत योजना लाभार्थी आणि प्रधानमंत्री स्वनिधी योजनेच्या लाभार्थ्यांना कार्डचे वितरण करण्यात आले.

प्रदर्शनात शासकीय योजनांसोबतच भारतीय टपाल विभागाच्या विविध योजना आणि आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षाच्या निमित्ताने एकात्मिक बालविकास सेवा योजनेमार्फत श्री अन्न रेसिपीसंदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली. भरडधान्यांचा वापर करून बनवण्यात आलेल्या चवदार पदार्थांचा आस्वाद या वेळी उपस्थितांनी घेतला. प्रदर्शनस्थळी लावण्यात आलेल्या स्वच्छ भारत अभियानासंदर्भातील सेल्फी पॉईंटला विशेष प्रतिसाद मिळाला.

प्रदर्शनस्थळी पनवेल तहसील कार्यालयामार्फत मतदार नोंदणी शिबिर घेण्यात येत असून नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आहे. (पान २ वर..)

## निवडक

### छत्तीसगडमध्ये आयईडी बॉम्बस्फोट; जवान जखमी

**रायपूर** : छत्तीसगड विधानसभा निवडणुकीमध्ये पहिल्या टप्प्यात मंगळवारी (दि. ७) मतदानप्रक्रिया पार पडली. या दरम्यान सुकमा जिल्ह्यात झालेल्या आयईडी बॉम्बस्फोटात सीआरपीएफचा एक जवान जखमी झाला आहे. श्रीकांत असे या जवानाचे नाव असून त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. क्रोब्रा २०६ आणि सीआरपीएफचे जवान टोंडामार्का येथून एलमागुंडा गावाकडे गस्तीसाठी जात असताना ही घटना घडली.

### पुणे शहरात साखळी बॉम्बस्फोटाचा होता कट

**पुणे** : येथे साखळी बॉम्बस्फोट घडविण्याचा कट दहशतवाद्यांनी रचला होता. आयसिसच्या महाराष्ट्रातील दहशतवाद्यांना सिरीयातून याबाबतच्या सूचना मिळाल्याची माहिती राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) तपासात उघडकीस आली आहे. एनआयएने मोहम्मद शाहनवाज आलम (रा. हजारीबाग, झारखंड) याला नुकतीच अटक केली. त्याच्या चौकशीत कट उघड झाला आहे.

# 'रामप्रहर'चा सायबर क्राईमवर आधारित दिवाळी अंक जनजागृतीसाठी उपयुक्त ठरेल

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा विश्वास



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाढत्या सायबर क्राईम घटनांचा आढावा घेणारा व जनजागृतीपर ठरणारा दैनिक रामप्रहरचा यंदाचा दिवाळी अंक वाचकांसाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंगळवारी (दि. ७) व्यक्त केला. ते दिवाळी अंक प्रकाशन समारंभात बोलत होते.

रायगड, नवी मुंबईत वाचकांच्या पसंतीस उतरलेल्या 'रामप्रहर'च्या टीमने ऑनलाईन गंडा या शीर्षकाखाली दिवाळी अंक प्रसिद्ध केला आहे. या अंकाचे प्रकाशन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या वेळी त्यांनी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

प्रकाशन समारंभास भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ.एस.टी.गडदे, 'रामप्रहर'चे मुख्य संपादक देवदास मटाले, व्यवस्थापक दादाराम मिसाळ, वृत्त संपादक समाधान पाटील, उपसंपादक तन्वी गायकवाड-पवार, सायली रावले-वैद्य, आर्टिस्ट शशिकांत बारसिंग, वितरण विभागाचे महेश काळे आदी उपस्थित होते.

'रामप्रहर'च्या दिवाळी अंकासाठी मुख्य आर्टिस्ट अरुण चवरकर, सुबोध ठाकूर, लेखापाल उद्धव घरत, कार्यालयीन कर्मचारी करण वाहुळकर यांचेही सहकार्य लाभले आहे.

# कर्जतमध्ये पुलावरून कार मालगाडीवर पडली

## अपघातात पत्रकारासह तिघांचा मृत्यू, दोघे गंभीर



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतहून नेरळकडे जाणारी इनोव्हा कार मंगळवारी (दि. ७) पहाटे ४च्या सुमारास किरवली गावाच्या हद्दीतील रेल्वे पुलावरून खाली मालगाडीवर पडली. या भीषण अपघातात एका पत्रकारासह तीन जणांचा जागीच मृत्यू झाला असून अन्य दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना प्रथमोपचार करून पनवेल येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

कर्जत तालुक्यातील मूळचे आसल गावचे आणि सध्या नेरळमध्ये राहणारे पत्रकार धर्मानंद यशवंत गायकवाड हे त्यांचे दोन मावस भाऊ व दोन मित्र यांच्यासह इनोव्हा कारने (एमएच ४६-बीआर ४२६१) नेरळकडे जात होते. त्यांची कार कर्जत-कल्याण राज्यमार्गावरील किरवली गावानजीक आली असता रेल्वेपुलाजवळ गायकवाड यांचा गाडीवरील ताबा सुटल्याने पुलाचे रेलिंग तोडून ही कार सुमारे ३५ फूट खाली पडली. त्याचवेळी पुलाखालून पनवेलहून कर्जतकडे मालगाडी चालली होती. ही कार त्या मालगाडीवर इतक्या जोरात आपटली की त्या मालगाडीचे मागील तीन डब्यांच्या दोन कपलिंग तुटून मालगाडीपासून तीन डबे वेगळे झाले.

या अपघाताची माहिती कळताच अनेकांनी धाव घेतली. अपघातात धर्मानंद गायकवाड (वय ४१) यांच्यासह मंगेश मारिया जाधव (वय ४६, रा. मुंबई) आणि नितीन मारुती जाधव (वय ४८) यांचा जागीच मृत्यू झाला. हे दोघेही धर्मानंद यांचे मावस भाऊ होते, तर संतोष सखाराम जाधव (वय ३८, रा. नेरळ) आणि जयवंत रामचंद्र हाबळे (वय ४३, रा. बेकरे) जखमी झाले. जखमींना पनवेल येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# महाड दुर्घटनेप्रकरणी चौकशी समिती गठीत

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाड एमआयडीसीतील ब्लू जेट हेल्थकेअर प्रा.लि.या कंपनीत झालेल्या आग व स्फोटाच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी या चौकशी समितीचे आदेश निर्गमित केले.

ब्लू जेट हेल्थकेअर कंपनीत झालेल्या दुर्घटनेत ११ व्यक्तींचे मृतदेह सापडले असून सात व्यक्ती जखमी झाल्या आहेत. या दुर्घटनेची तीव्रता पाहता घडलेल्या याची सखोल चौकशी करण्याचे निर्देश पालकमंत्री उदय सामंत यांनी पाहणीवेळी दिले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५मधील कलम (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार चौकशीसाठी समिती गठीत केली आहे.

चौकशी समितीत डॉ. ज्ञानोबा बानापुरे अध्यक्ष (उपविभागीय दंडाधिकारी, महाड) तसेच केशव केंद्रे (उपसंचालक, सदस्य औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभाग, रायगड), जी.एस. हरलय्या (महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड), बाबासाहेब वाघ (कामगार उपायुक्त, पनवेल), एस.बी. काळे (उपविभागीय पोलीस अधिकारी, महाड), जे.एस. हजारे (प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड), आर. जे. पाटील (कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोरेगाव), प्रवीण घोलप (मुख्य अग्निशमन सदस्य अधिकारी, अग्निशमन केंद्र, महाड एमआयडीसी) आणि महेश शितोळे, तहसीलदार महाड (सदस्य सचिव) यांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त उपविभागीय दंडाधिकारी महाड यांनी त्यांना आवश्यक असणाऱ्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांची नियुक्ती त्यांच्या स्तरावर करावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सूचित केले आहे. (पान २ वर..)

## सिद्धिविनायक मंदिर न्यासाच्या अध्यक्षपदावरून आदेश बांदेकरांना हटवले

**मुंबई : प्रतिनिधी**

### आमदार सदा सरवणकर यांची नियुक्ती

मुंबईतील प्रसिद्ध देवस्थान सिद्धिविनायक मंदिर न्यासाच्या अध्यक्षपदावरून उद्धव ठाकरे गटाचे नेते आदेश बांदेकर यांना हटवण्यात आले आहे तसेच बांदेकर यांच्या जागी शिवसेनेचे आमदार सदा सरवणकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याबाबत आमदार सदा सरवणकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'मी स्वतःला भाग्यवान समजतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी माझ्यावर विश्वास व्यक्त करून सिद्धिविनायकसारख्या पवित्र संस्थेची जबाबदारी सोपवली. गेली अनेक वर्ष मंदिर परिसरात गणेशभक्तांच्या अडचणी पाहिल्या आहेत. त्यामुळे आता मला गणेशभक्तांसाठी बरेच काम करता येईल, असे आमदार सरवणकर यांनी म्हटले आहे.

# रायगडातील दरडग्रस्त गावांच्या पुनर्वसनाचे प्रस्ताव सादर करा

## मंत्री अनिल पाटील यांच्याकडून कार्यवाहीची ग्वाही

**अलिबाग : प्रतिनिधी**

मदत व पुनर्वसनमंत्री अनिल पाटील यांच्या मंत्रालयातील दालनात रायगड जिल्ह्यातील दरडग्रस्त गावांच्या पुनर्वसनाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी मंत्रीमहोदयांनी दरड प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगानेदेखील प्रस्ताव प्रशासनाकडून मागवून याबाबतीत तातडीने कार्यवाही करण्याची ग्वाही दिली.



या बैठकीस महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, पुनवर्सन विभागाचे अधिकारी, वरसगाव उपसरपंच राकेश शिंदे, तिसे उपसरपंच राजेश कदम, संगे सरपंच संजय सानप, मेढाचे सदानंद गोवर्धने, जयंत गोवर्धने, तिसे ग्रामपंचायत सदस्य महेश पवार, संभेचे गणेश सानप, संदेश सानप उपस्थित होते. या वेळी मेढा हनुमाळ माळी, शिंगरकोंड (मोरेवाडी), तिसे येथील दरडग्रस्त पुनर्वसनाबाबत विविध समस्या मंत्री आदिती तटकरे यांनी मांडल्या.

मंत्री अनिल पाटील म्हणाले की, रायगड जिल्ह्यातील दरडप्रवण क्षेत्रातील गावांचे कायमस्वरूपी करावयाच्या पुनर्वसनाबाबत स्थानिक प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी. रोहा तालुक्यातील मेढा हनुमाळ माळी, शिंगरकोंड (मोरेवाडी), तिसे या गावातील दरड प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या अनुषंगाने तसेच म्हसळा तालुक्यातील लिपणी वावे व मोहम्मद खनीखार या गावांच्या पुनर्वसन प्रस्तावावर जिल्हाधिकारी कार्यालयाने तातडीने कार्यवाही करावी. प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही केली जाईल. (पान २ वर..)

# सिडकोच्या अर्जदारांना हप्ते भरण्याकरिता मुदतवाढ

**नवी मुंबई : सिडको वृत्तसंस्था**

महागृहनिर्माण योजना २०१८-१९मधील सदनिकेच्या हप्त्यांचा भरणा न केलेल्या अर्जदारांना सदनिकेची संपूर्ण रक्कम भरण्याकरिता १० जानेवारी २०२४पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडको महामंडळातर्फे घेण्यात आला असून अर्जदारांनी केलेल्या विनंतीवरून मुदतवाढ देण्यात आली आहे.

सिडको महागृहनिर्माण योजनेंतर्गत २०१८-२०१९दरम्यान विविध प्रवर्गांकरीता सदनिकेच्या सोडती काढण्यात आल्या होत्या. या सोडतीमधील सदनिका या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. नवी मुंबईतील तळोजा, खारघर, कळंबोली, घणसोली, द्रोणागिरी या पाच नोडमध्ये गृहनिर्माण योजनेतील सदनिका साकारण्यात आल्या आहेत.

छाननीअंती पात्र ठरलेल्या अर्जदारांना वाटपपत्रे देण्यात आली होती. या वाटपपत्रांमध्ये, अर्जदारांना सदनिकेपोटी भरणा करावयाच्या रकमेच्या हप्त्यांचे वेळापत्रक नमूद करण्यात आले होते. त्यानुसार काही




अर्जदारांनी एकूण हप्त्यांपैकी काही हप्त्यांचा भरणा केलेला आहे व काही अर्जदारांनी आजतागयत एकाही हप्त्याचा भरणा न केल्याचे आढळून आले आहे, असे अर्जदार कायद्यानुसार वाटपपत्र रद्द करण्यास पात्र ठरतात.

तथापि, यापैकी काही अर्जदारांकडून हप्त्यांचा भरणा करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी, अशी विनंती करण्यात आली होती. त्या अनुषंगाने, सिडको महामंडळाकडून ३० एप्रिलपर्यंत हप्त्यापोटी शिल्लक रकमेचा भरणा करण्याकरिता विलंबशुल्कात सवलत देण्याबाबतची अभय योजना राबविण्यात आली होती, परंतु या योजनेचा लाभ काही अर्जदार त्यांच्या विविध अडचणींमुळे घेऊ शकले नसल्यामुळे त्यांनी याकरिता मुदतवाढ देण्याची विनंती सिडकोकडे केली होती. त्यानुसार ९ सप्टेंबर २०१९ ते २१ फेब्रुवारी २०२२ या कालावधीत वाटपपत्रे देण्यात आलेल्या अर्जदारांपैकी थकबाकीदारांसाठी १० जानेवारी २०२४पर्यंत विलंब शुल्कासह उर्वरित सर्व हप्त्यांचा भरणा करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

या कालावधीत जे अर्जदार संपूर्ण रकमेचा भरणा करण्यास असमर्थ ठरतील, अशा थकबाकीदार अर्जदारांची वाटपपत्रे रद्द करण्यात येऊन नियमानुसार त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच हप्त्यापोटी भरलेल्या रकमेपैकी १० टक्के रक्कम कापून उर्वरित रकमेचा परतावा अर्जदारांच्या बँक खात्यात करण्यात येईल.

**प्रत्येक सामान्य माणसाचे घराचे स्वप्न पूर्ण व्हावे असा प्रयत्न नेहमीच सुरू असतो. याच अनुषंगाने सिडको महामंडळाच्या २०१८-१९ महागृहनिर्माण योजनेमध्ये जे अर्जदार पात्र असूनदेखील हप्ते भरू शकले नाहीत त्यांना दिवाळीच्या शुभमुहूर्तावर ही सुवर्णसंधी उपलब्ध करून दिल्याने त्यांचा आनंद द्विगुणित होईल यात शंका नाही. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.**

**-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

**सिडको महामंडळाच्या २०१८-१९ महागृहनिर्माण योजनेतील पात्र अर्जदारांनी वेळोवेळी केलेल्या विनंतीचा विचार करून, मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार अशा पात्र अर्जदारांना पुन्हा एक अंतिम मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतल्याने निश्चितच आणखीन अनेक नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत होणार आहे.**

**-अनिल डिग्गिकर, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक सिडका**

## मंत्रालयात दिवाळी फराळ व सजावट साहित्याच्या स्टॉलचे उद्घाटन



**मुंबई : प्रतिनिधी**

महिला बचत गटांनी तयार केलेले दिवाळीसाठीचे सजावट साहित्य, फराळ, सेंद्रिय शेतमाल उत्पादनाच्या साहित्यांच्या विविध स्टॉलचे मंत्रालयात महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी उद्घाटन केले.

मंत्रालय त्रिमूर्ती प्रांगणात दिवाळीनिमित्त महिला व बालविकास विभागातंर्गत ६ ते १० नोव्हेंबर या कालावधीत राज्यातील विविध महिला बचत गटांमार्फत बनविण्यात आलेल्या उत्पादनांची प्रदर्शन व विक्री करण्यात येत आहे. या वेळी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक इंदू जाखड उपस्थित होत्या.

महिलांना औद्योगिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यास सहकार्य करण्यासाठी राज्य शासन महिला बचत गटांना प्रोत्साहन देत असल्याचे मंत्री तटकरे यांनी या वेळी सांगितले. त्यांनी दिवाळी फराळाचा आस्वाद घेतला आणि महिलांशी संवाद साधत त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

क्षितीज सीएमआरसी, मुंबई जिल्ह्याचा दिवाळी फराळ, स्वाभिमान प्रोजेक्ट सीएमआरसी, मुंबई जिल्ह्याचा दिवाळी सजावट साहित्य, दीपिका गृह उद्योग, ठाणे जिल्ह्याचा रुरल मार्ट, तनिष्का सीएमआरसी, मुंबई जिल्ह्याचा लोकरीच्या हस्तकला तोरण, लेदर वर्क आणि बुक, घे भरारी सीएमआरसी, मुंबई जिल्ह्याचा ज्वेलरी आणि दिवाळी फराळ, उन्नती बचत गट, मुंबई जिल्ह्याचा चॉकलेट आणि पणत्या, नवतेजस्विनी कला दालन, पुणे जिल्ह्याचा ज्यूट प्रोडक्ट, संकल्प आणि खुशिया सीएमआरसी, चंद्रपूर जिल्ह्याचे कार्पेट व बांबू आर्ट, चेतना सीएमआरसी आणि राणीकाजल सीएमआरसी, नंदुरबार जिल्ह्याचे मिलेट, धूपबत्ती उत्पादने, ओवी शेतकरी उत्पादक कंपनी, जालना जिल्ह्याचे सेंद्रिय शेतमाल उत्पादने प्रदर्शन व विक्रीसाठी मंत्रालयात उपलब्ध आहेत.

## भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांचे मुंबईत आगमन

**मुंबई : प्रतिनिधी**

भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांचे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबई येथे भारतीय वायू सेनेच्या विमानातून मंगळवारी (दि. ७) सकाळी आगमन झाले.



उपमुख्यमंत्री तथा राजशिष्टाचारमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, कौशल्य विकास व पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी राजे वांगचुक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

या वेळी मुख्य सचिव मनोज सौनिक, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी तथा अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्यासह पोलीस व राजशिष्टाचार विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात विद्यार्थी दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७ नोव्हेंबर हा विद्यार्थी दिन म्हणून महाराष्ट्रभर साजरा केला जातो. मंगळवारी (दि. ७) विद्यार्थी दिन सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय उलवे येथे साजरा करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. जी. हजारे यांनी तसेच विद्यालयाच्या क्लार्क भारती




कोळी यांनी प्रतिमेचे पूजन केले.

गुरुकुल तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहुजन समाजासाठी असणारे योगदान आपल्या भाषणातून विशद केले, तसेच मुख्याध्यापक डी. जी. हजारे यांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजाप्रती असलेले योगदान आपल्या भाषणातून समजावून सांगितले.

इयत्ता नववीतील विद्यार्थी कुमारी चंदा माळी हीने सात नोव्हेंबर १९०० या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गव्हर्मेंट इंग्लिश मीडियम स्कूल म्हणजेच आताचे प्रतापसिंह हायस्कूल या शाळेत घेतलेला प्रवेश त्यांचा १९१४ हा रजिस्टर नंबर आणि त्यांच्या शिक्षणामुळे महाराष्ट्रात झालेले अमुलाग्र बदल या विषयी अतिशय उत्कृष्ट भाषण केले. या कार्यक्रमाचे निवेदन विद्यालयाच्या उपशिक्षिका पी. आर. पवार यांनी केले.

पान १ वरुन

### काश्मीर खोऱ्यात शिवरायांचा जयघोष

छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे भारतात आणण्याचा करार करण्यात आला असून ही अभिमानाची बाब आहे. वाघनखे राज्यात आणल्यानंतर ठिकठिकाणी दर्शनासाठी ठेवली जातील, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काश्मीरमधील कलम ३७० हटवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्यानंतर आता काश्मीरच्या विकासाचा नवा अध्याय सुरू झाला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली नायब राज्यपाल सिन्हा यांनी गेल्या महिन्यात काश्मिर येथे जी २० परिषद घेतली, असेही मुख्यमंत्री शिंदे या वेळी म्हणाले.

कुपवाडा येथे असलेले हे स्मारक जम्मू-काश्मीरला भेट देणाऱ्या देशातील लोकांसाठी एक प्रेरणास्थान बनेल. आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्रोत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यात आला आहे. हे स्मारक महाराष्ट्र आणि काश्मीरमधील संबंध अधिक दृढ करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावातच शक्ती, ऊर्जा आहे. दैनंदिन जीवनातील प्रत्येक समस्येवर मार्ग दाखविण्यासाठी शिवरायांचे विचार दिशादर्शक असल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या वेळी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे भारतात आणण्यासाठी लंडनमध्ये करार करण्यात आला. राज्यासाठी ही अभिमानाची बाब असल्याचेही ते म्हणाले.

आज कुपवाडा येथे नव्या परंपरेला सुरुवात झाली असून यापुढे प्रत्येक वर्षी कुपवाडा येथे ७ नोव्हेंबरला छत्रपती शिवाजी महाराज पर्व साजरे करण्यात यावे, असे आवाहन जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी जवानांना केले. 'स्वत:वर विश्वास ठेवा, मी नेहमी तुमच्यासोबत असेन' हा शिवरायांनी शूरवीरांना दिलेला संदेश मराठीतून वाचत सिन्हा यांनी विविध इतिहासकार आणि कवींनी लिहिलेल्या महाराजांच्या पराक्रम गाथांना उजाळा दिला.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. या वेळी संस्थेचे विश्वस्त श्री. शिरोळे, मेजर जनरल गिरीष कालिया यांनी मनोगत व्यक्त केले. या सोहळ्यास मराठा बटालियनचे जवान, लष्करी अधिकारी आदी उपस्थित होते.

### मोदी सरकारच्या कल्याणकारी योजना नागरिकांच्या जीवनात आशेचे किरण

प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभास भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, कीर्ती नवघरे, सरचिटणीस दीपक शिंदे, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, अभिमन्यू पाटील, रामजी बेरा, निलेश बाविस्कर, माजी नगरसेविका अनिता पाटील, आरती नवघरे, महिला मोर्चा अध्यक्ष साधना पवार, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, गुरू गायकर, समीर कदम, अमर उपाध्याय, दिलीप जाधव, संजय घरत, सचिन वासकर, राजेंद्र मांजरेकर, अजय माळी, संदीप रेड्डी, ॲड. राजेंद्र अगरवाल, मोना अडवाणी, गीता चौधरी, वासुदेव पाटील, नवनीत मारू, किरण पाटील, विजय पाटील, विनोद ठाकूर, अनिल खोपडे, निर्मला यादव, अंकिता वारंग, अश्विनी भुवड, मीनाक्षी अंथवाल, सुशीला शर्मा, मधुमिता जेना, शामला सुरेश, सीमा खडसे, नंदा पानसरे, मयूर घरत, अनिकेत पाटील, केतन नवघरे, अक्षय लोखंडे, दीपक ठाकूर, सर्जेराव मेंगणे, आदित्य घाडगे, संदीप माघाडे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### महाड दुर्घटनेप्रकरणी चौकशी समिती गठीत

या समितीने सर्व स्तरावर सखोल चौकशी करणे, कंपनीच्या सर्व सुरक्षा यंत्रणा तपासणी करणे, कंपनीने घेतलेल्या सर्व स्तरावरील मान्यता व परवाने तसेच त्यातील अटी व शर्ती यांचे पालनाची तपासणी करणे, घडलेल्या घटनेच्या कारणांचा स्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करणे ही कार्यवाही करावयाची आहे.

या प्रकरणाची चौकशी विहीत मुदतीत पूर्ण करणे आवश्यक असल्याने चौकशी समितीने या प्रकरणी चौकशीसाठी कोणत्याही व्यक्ती, संस्था अथवा कंपनी यांना साक्षीकामी अथवा अहवाल सादर करण्याकामी निर्देश दिल्यास अहवाल सादर करणे त्यांच्यावर बंधनकारक राहील. असे न करणाऱ्या संबंधिताविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

### रायगडातील दरडग्रस्त गावांच्या पुनर्वसनाचे प्रस्ताव सादर करा

महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, मेढा हनुमाळ माळी गावचे पुनर्वसन करणे, तिसे येथे दरड कोसळल्याबाबत, भिंगारकोड (मोरेवाडी) या गावातील दरडग्रस्त कुटुंबीयांचे कायमस्वरूपी पुनर्वसन होण्याबाबत तसेच रायगड जिल्ह्यातील इतर ठिकाणच्या दरड प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या अनुषंगाने कार्यवाही होणे गरजेचे आहे. स्थानिक प्रशासनाकडून मदत व पुनर्वसन विभागाला आलेल्या प्रस्तावांना लवकर मान्यता मिळावी, ज्यायोगे या प्रस्तावाची कामे तातडीने सुरू करता येतील.

## स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी अभियानांतर्गत थ्री आर सेंटर्सना प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत या दिवाळी उत्सवामध्ये स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी हे अभियान जाहीर करण्यात आले आहे. या अनुषंगाने दिवाळीपूर्वी घरोघरी केल्या जाणाऱ्या साफसफाईमध्ये नागरिकांकडून त्यांना नको असलेल्या चांगल्या वस्तू मोठया प्रमाणावर कचऱ्यामध्ये टाकून दिल्या जातात. वास्तविक या वस्तू गरजूंच्या वापरात येऊ शकतात. त्यामुळे नागरिकांनी साफसफाईतून बाजूला काढलेल्या, नको असलेल्या वस्तू नवी मुंबई महापालिकेमार्फत शहरात ठिकठिकाणी उभारण्यात




आलेल्या थ्री आर सेंटर्समध्ये आणून ठेवाव्यात, असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यामार्फत करण्यात आले होते. जेणेकरून ज्यांच्या उपयोगी पडतील असे गरजू नागरिक त्या सेंटर्समधून घेऊन जातील.

'नको असेल ते द्या, हवे असेल ते घ्या' या संकल्पनेवर आधारित 'आहे रे' वर्गाला 'नाही रे' वर्गाशी जोडणारी ९२ इतक्या मोठया संख्येने थ्री आर सेंटर्स नवी मुंबई महापालिकेने सर्व विभागांमध्ये सुरू केली असून दिवाळीच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी केलेल्या आवाहनास अनुसरुन नागरिक घरात दिवाळीपूर्व साफसफाई करताना आढळलेल्या आपल्याला नको असलेल्या चांगल्या वस्तू मोठ्या प्रमाणात आपल्या घराजवळच्या थ्री आर सेंटर्समध्ये आणून ठेवत आहेत व त्या वस्तू ज्यांना आवश्यक आहेत असे गरजू नागरिक तेथून घेऊन जात आहेत.

बिंदुरा फाउंडेशनच्या वतीने या 'थ्री आर' सेटर्सची एक समाजपयोगी उपक्रम म्हणून नियमीत देखभाल केली जात आहे. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवरही स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी या अभियानांतर्गत आयुक्तांनी केलेल्या आवहानास अनुसरुन थ्री आर सेंटर्सला वस्तू देणारे व वस्तू घेणारे अशा दोन्ही नागरिकांकडून चांगला प्रतिसाद लाभत आहे.

## रेल्वे स्टेशनमध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** रेल्वेस्टेशन फलाट क्र. ५ येथे एका वृद्ध व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध रेल्वे पोलीस करीत आहेत.

मृत व्यक्तीचे अंदाजे वय ६५ वर्षे, उंची पाच फूट चार इंच, अंगाने मध्यम, रंग निम गोरा, डोक्याचे केस पांढरे चेहरा गोल, नाक सरळ असून, अंगात सफेद रंगाचा नेहरू शर्ट व सफेद गुलाबी रंगाची त्यावर लाल ठिपके असलेली सलवार घातलेली आहे.


त्याचप्रमाणे फलाट क्रमांक ६/७ च्या एक्सलेटर जिन्याच्या खाली एका व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत.

मृत व्यक्तीचे अंदाजे वय ३६ वर्षे, उंची पाच फूट पाच इंच, अंगाने सडपातळ, रंग काळा सावळा, नाक सरळ, चेहरा उभट, दाढी वाढलेली असून डाव्या हातावर गोंदलेले आहे. उजव्या हातावर ॐ असे गोंदलेले आहे. त्याचप्रमाणे त्याच्या अंगात निळी सँडो बनियान, फिकट निळी जीन्स पॅन्ट व आतमध्ये जांभळी छोटी पॅन्ट आहे.

या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (०२२-२७४६७१२२) किंवा पोलीस उपनिरीक्षक एम. डी. गवळी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

## दुखवटा

### भावना लोकरे



**मुरूड :** सुप्रसिद्ध भजन सम्राट रत्नागिरीचे सुपुत्र भगवान बुवा लोकरे यांच्या सौभाग्यवती भावना लोकरे यांचे नुकतेच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्या ६७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, तीन विवाहित मुली, सुना, जावई असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर नाहूर मुंबई येथे स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी भजन क्षेत्रातील नामवंत मंडळी तसेच जय हनुमान प्रसादिक भजन मंडळातील महेंद्र माळी, रमाकांत राऊत उपस्थित होते.

### रघुनाथ पाटील



**उरण :** तालुक्यातील चिरनेर येथील रघुनाथ नागा पाटील यांचे निधन झाले आहे. ते ७३ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर मुलुंड येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक पुत्र, एक कन्या, नातवंडे असा परिवार आहे. आर. एन. पाटील या नावाने ते सुपरिचित होते. त्यांच्या मुख्याध्यापक पदाच्या निवृत्तीनंतर ते चिरनेर येथील पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या विद्यासंकुलनात प्रशासकीय अधिकारी म्हणून काम पाहत होते.

# जनतेला सुविधा देण्यासाठी भाजप कटिबद्ध

## आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्वाही; पिसार्वे येथे अमृत योजनेंतर्गत भूमिपूजन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून जास्तीत जास्त सुविधा मिळवून देण्यासाठी भारतीय जनता पक्ष कटीबद्ध आहे, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी (दि. ७) पिसार्वे येथे अमृत योजने अंतर्गत भूमिपूजनावेळी दिली.

पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १ मधील अमृत टप्पा २.० योजने अंतर्गत पिसार्वे तालवाचे ११ कोटी ३३ लाख ६७ हजार १६९ रुपये खर्चून सुशोभीकरण करण्यात येणार आहे. या सुशोभीकरणाच्या कामाचा शुभारंभ भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमनदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक हरेश केणी, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, निर्दोष केणी, दिनेश केणी, पापा पटेल, माजी नगरसेविका जयश्री म्हात्रे, नंदकुमार म्हात्रे, चाऊशेठ पाटील, राजेश महादे, संजय म्हात्रे, अविक महादे, प्रकाश म्हात्रे, जनार्दन म्हात्रे, संतोष पाटील, सुरेश पोरजी, पांडुरंग पाटील, भास्कर तरे यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तालावाच्या सुशोभीकरणासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

दरम्यान, भारतीय जनता पक्ष अणि विकास हे एक समीकरण बनले आहे. त्यानुसार पनवेल तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विकासाची कामे सुरू आहेत.





**खारघर : ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाजपने भिंगार ग्रामपंचायतीवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले असून सरपंचपदी गुलाब रामदास वाघमारे भरघोस मतांनी विजयी झाले. नवनिर्वाचित सरपंच आणि सदस्यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी अशोक राजाराम गायकर, शामल लहाने, सुनील पाटील, उज्ज्वला वाघमारे, प्रिया पाटील, सुभाष पाटील, करिना पाटील, अशा वाघमारे आदी उपस्थित होते.** (छाया : प्रफुल्ल कांबळे)

# मोबाईल चोरणारी टोळी गजाआड

## गुन्हे शाखा कक्ष २कडून पाच लाखांचे फोन हस्तगत; तब्बल १७ गुन्हे उघडकीस

**पनवेल : वार्ताहर**

मोटरसायकल वरून जबरीने मोबाईल खेचून चोरी करणाऱ्या टोळीस गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेल कडून अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून ५,०२,७०० रूपये किंमतीचे एकुण २९ मोबाईल फोन हस्तगत केले आहेत. त्यांच्या अटकेमुळे १७ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमध्ये काही अज्ञात आरोपी हे मोटरसायकलवरून येऊन मोबाईल फोनवर बोलत पायी चालत जाणाऱ्या व्यक्तींचे हातातील फोन जबरीने खेचुन चोरी करून घेवून जात असल्याबाबत अनेक गुन्हे दाखल आहेत. आरोपींनी अशा प्रकारे मोबाईल फोन जबरीने खेचुन नेणे अशा गंभीर गुन्हयांची तात्काळ उकल करण्याबाबत पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) दीपक साकोरे, अमित काळे, पोलीस उप आयुक्त गुन्हेशाखा यांनी आदेशीत केले होते. अशा प्रकारचे गुन्ह्यांमध्ये आरोपी हे त्यांच्याकडील मोटर सायकल वरून अचानक येवून क्षणाचा ही विलंब न घालविता मोबाईल फोन जबरीने खेचुन नेत असल्याने गुन्हयातील फिर्यादी व साक्षीदार यांचेकडुन आरोपींचे वर्णनाबाबत माहिती मिळविणे अवघड होते त्यामुळे सदरचे गुन्हे उघडकीस आणने पोलीसांना अतिशय आव्हानात्मक होते.

गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने गजानन राठोड, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हेशाखा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उमेश गवळी, गुन्हे शाखा कक्ष २, पनवेल, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये घडलेल्या गुन्हयांची माहिती प्राप्त केली. घडलेल्या गुन्हयांचे घटनास्थळी भेटी दिल्या. गुन्हयातील फिर्यादी, साक्षीदार यांना भेटुन तांत्रिक तपासादम्यान आरोपींबाबत जास्तीत जास्त माहिती संकलीत करून अशा प्रकारचे गुन्हे करणारी काही ठराविक आरोपींची टोळी सक्रिय झाली असल्याची खात्री केली.

गुन्हे शाखा कक्ष २, पनवेल चे पथकाने गोपनिय बातमीदाराच्या मदतीने आरोपींबाबत माहिती प्राप्त करून चार जणांना अटक केली असून त्यांच्या कडून. त्यांच्याकडून ५,०२,७०० रूपये किंमतीचे एकुण २९ मोबाईल फोन हस्तगत केले आहेत. त्यांच्या अटकेमुळे १७ गुन्हे उघडकीस आणले आहेत.



# ग्रामपंचायत निवडणूक विजयी उमेदवारांचे अभिनंदन अन् शुभेच्छा!







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. या निडवणूकांमध्ये भारतीय जनता पक्षाचा गुलाल उधळला असून महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या विचुंबे ग्रामपंचायतींवर भाजपने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. या निवडणुकीत विजयी नवनिर्वाचित सरपंच प्रमोद भिंगारकर तसेच सदस्यांनी मंगळवारी (दि. ७) भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर व भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची भेट घेतली.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर व भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी प्रमोद भिंगारकर यांच्यासह नवनिर्वाचित सदस्यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील यशस्वी वाटचालीकरता शुभेच्छा दिल्या आहेत. या वेळी भाजपचे गाव कमिटी अध्यक्ष के. सी. पाटील, किशोर सुरते, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, राजेश पाटील, सदस्य अनिल भोईर, श्रावणी भोईर, प्रगती गोंधळी, आरती गायकवाड, विभूती सुरते, अनंता गायकवाड, हेमंत माने, सल्लागार नितीन भोईर, भाई भोईर, राम म्हात्रे, माजी सरपंच अमिता म्हात्रे, अविनाश गायकवाड, संजीत भिंगारकर, डी.के. भोईर, निलेश म्हात्रे, किरण भोईर, दादा गोंधळी, श्याम म्हात्रे, चेतन सुरते, सुनील पाटील, आनंद गोंधळी, संदीप पाटील, महेश पाटील यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# जुई येथील जि.प. शाळेत स्वच्छतागृहाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेच्या पनवेल तालुक्यील जुई येथील शाळेत युनियन बँक ऑफ इंडिया यांच्या सौजन्याने बांधण्यात आलेल्या नवीन शालेय स्वच्छतागृहाचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, युनियन बँकेचे रीझनल ऑफिसर संतोषकुमार झा, माजी सरपंच भाऊ भगत यांच्या हस्ते झाले.

शाळेची विद्यार्थी पटसंख्या पाहता शाळेला स्वच्छतागृहाची फार मोठी गरज होती. ही अडचण लक्षात घेऊन युनियन बँकेने विद्यार्थ्यांसाठी अतिशय चांगल्या दर्जाचे स्वच्छतागृह बांधून दिले आहे. बँकेने खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी जपली आहे. उपस्थित मान्यवर, ग्रामस्थ मंडळी व शिक्षक वर्गाने बँकेचे आभार मानले आहे. या कार्यक्रमाला कामोठे शाखा व्यवस्थापक मनिषकुमार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भास्कर भेंडे, हनुमान जोशी, वामन चिमणे, मधुकर सुरते, मंगेश चिमणे, अरुण गोवारी, विश्वास भगत आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक अरुण मोरे, मोतीराम पोकळे, संजय पाटील, सुजाता माने, आरती वाडेकर, दिप्ती घोलप या शिक्षक वृंदाने मेहनत घेतली.




# पनवेलमधील विकसकांना वायू प्रदूषणाबाबत निर्देश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांपासून एमएमआर परीसरातील हवेची गुणवत्ता बिघडल्याने मुंबई हायकोर्टाने सुओ मोटो जनहित याचिका सुनावणी दरम्यान कठोर निर्देश दिले आहेत. त्यानूसार आयुक्त गणेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील विकासकांची ऑनलाईन बैठक मंगळवारी (दि. ७) घेण्यात आली. या वेळी आयुक्त गणेश देशमुख यांनी पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील विकसकांना हवेची गुणवत्ता राखून ठेवण्याच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.



या वेळी नगररचना सहाय्यक संचालक ज्योती कवाडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, महापालिका कार्यक्षेत्रातील बांधकाम क्षेत्रातील प्रमुख विकसक, पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण तसेच, प्रभाग अधिकारी उपस्थित होते. या वेळी आयुक्तांनी सूचना देताना सांगितले. प्रामुख्याने सर्व विकासकांनी बांधकाम प्रकल्पांच्या भोवती किमान २५ फूट उंचीचे धातूचे पत्रे लावणे आवश्यक असल्याचे सांगितले तसेच बांधकाम चालू असणाऱ्या सर्व इमारती तसेच पाडण्यात आलेल्या सर्व इमारतींच्या भोवती ओल्या हिरव्या कापडाने, ओल्या तागाच्या कापडाने, ताडपत्रीने बंदिस्त करणे आवश्यक आहे.

या वेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या सूचना विकासकांना सांगितल्या. यामध्ये सर्व बांधकामच्या ठिकाणी मोबाईल अँटी स्मॉग गनच्या सहाय्याने लोडिंग, अनलोडिंगदरम्यान पाणी फवारणी करणे बंधनकारक असेल. बांधकाम साहित्य तसेच रेडी मिक्स काँक्रीट वाहून नेणारी सर्व वाहने पूर्णपणे वरच्या बाजूने व सर्व बाजूंनी पूर्ण झाकलेली असावीत. वाहनातून कोणत्याही प्रकारे गळती होऊ नये तसेच ओव्हरलोड होऊ नये, ह्याची दक्षता घेणे बंधनकारक असणार आहे.

या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे तसेच ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्यांचे वाहन तत्काळ जप्त करण्याबाबत पोलीस विभागाकडून कारवाई करण्यात येणार असल्याचे विकासकांना सूचित करण्यात आले.



**पनवेल : कै. वसंत डावखरे यांच्या जयंतीनिमित्त वसंत स्मृती पुरस्कार सन २०२३चा आदर्श शिक्षक पुरस्कार देवेंद्र काशिनाथ म्हात्रे यांना मिळाला आहे. त्याबद्दल त्यांचे अनंता ठाकूर, एन. सी. घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सुहास भगत, संदीप म्हात्रे, कैलास घरत आदींनी अभिनंदन केले.**

## संपादकीय

# कठोर कारवाईची गरज

गेली काही वर्षे प्रतिवर्षी आपण दिल्लीमधील टोकाच्या वायु प्रदूषणाच्या बातम्या वाचत होतो तेव्हा, लवकरच मुंबईतील हवेच्या प्रदूषणाबाबत थेट मुंबई उच्च न्यायालयाला कठोर भूमिका घ्यावी लागेल असे कुणालाही वाटले नसेल. आजच्या घडीला दिल्ली हे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले असून एक्यूएअर या स्विस संस्थेच्या जागतिक वायू गुणवत्ता निर्देशांकात जगातील १० सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये तीन भारतीय शहरांचा समावेश आहे. राजकीय पक्षांनी या प्रश्नावर आरोप-प्रत्यारोप करण्याऐवजी या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन उपाययोजनेवर तातडीने विचार केला पाहिजे.

**मुंबई व आसपासच्या परिसरातील वायू प्रदूषण हे निव्वळ चर्चेत नसून ते सर्वसामान्यांना नजरेलाही दिसते आहे. दुपारपर्यंत मुंबई व मुंबई महानगर प्रदेशातील काही भागांमध्ये नजरेला दिसण्याइतपत धुरके असते. देशाच्या राजधानीपाठोपाठ, आर्थिक राजधानीतील नागरिकांचेही आरोग्य धोक्यात आल्याने मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी या प्रश्नाची गंभीर दखल घेत कठोर निर्बंध लागू केले. खरे तर हल्ली कुठलाही सण जवळ आला की तो सुरू होण्याआधी कुठल्या न कुठल्या बाबतीत निर्बंधांची संक्रांत कोसळतेच. हेही जनतेला आता सवयीचेच झाले आहे, पण याखेपेला परिस्थिती खरोखरच गंभीर आहे. त्यामुळेच शुक्रवारच्या पुढील सुनावणीपर्यंत हवेची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात सुधारल्याचे न आढळल्यास बांधकामे व पायाभूत सुविधा सार्वजनिक प्रकल्पांतील बांधकाम ठिकाणांवर बांधकामाचे साहित्य नेण्यास बंदी घालण्याचा आदेश न्यायालयाला द्यावा लागेल असा कडक इशाराही उच्च न्यायालयाने आताच दिला आहे. तूर्तास मुंबई शहरासह महानगर प्रदेशात हवेची गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीने दिवाळीत फटाके वाजवण्यावर न्यायालयाने सोमवारी निर्बंध घातले. त्यानुसार आता केवळ सायंकाळी सात ते रात्री दहा असे तीन तासच फटाके वाजवण्यास परवानगी असेल. मुंबई शहरात सध्या सहा हजारपेक्षा अधिक बांधकाम प्रकल्प सुरू असल्याचे सांगण्यात येते. त्याखेरीज महापालिकेचे प्रकल्प व काही मोठ्या विकास प्रकल्पांचेही काम सुरू आहे. केंद्र सरकारनेही मुंबईतील प्रदूषणाची दखल घेतली असून केंद्राचे पथक शहरातील हवेच्या गुणवत्तेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी याच आठवड्यात शहरात दाखल होणार आहे. नागरिकांमध्ये खोकला, सर्दी, श्वसनाचे विकार, दमा यांच्या त्रासात वाढ झाल्याचे सार्वत्रिकरित्या दिसते आहे. त्यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडताना मास्क वा रूमाल बांधण्याचे आवाहन राज्याच्या आरोग्य संचालकांकडूनही करण्यात आले आहे. विशेषत: लहान मुले व गरोदर महिलांना काळजी घेण्यास सांगण्यात आले आहे. दरम्यान, मुंबई महापालिकेच्या सर्व विभागांतील पथके कामाला लागली असून प्रदूषण रोखण्यासाठी केलेल्या नियमांचे पालन केले जाते की नाही याची पाहणी छापे टाकून केली जाते आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या विकासकांवर दंडात्मक कारवाई केली जाते आहे. तिकडे दिल्लीत तर प्रदूषणामुळे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी मिनी लॉकडाऊनच जारी केल्यामुळे केजरीवाल यांच्यावर ते हुकुमशहाप्रमाणे वागत असल्याची टीका होते आहे. काही दिवसांपूर्वी मुंबईतही प्रदूषणावरून असे आरोप-प्रत्यारोपांचे मोहोळ उठले होते. स्वत:च हजारो बांधकामांना परवानगी देऊन शिवसेनेचा ठाकरे गट आता महापालिका आयुक्तांना हवेतील प्रदूषणासाठी जबाबदार धरतो आहे याला काय म्हणावे? वास्तवत: बांधकामांमुळे वायू प्रदूषण होऊ नये यासाठीची नियमावली कागदोपत्री तयारच आहे, परंतु या नियमांचे पालन होते आहे की नाही हे काटेकोरपणे पाहून नियम धुडकावणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हायला हवी आहे.**

# ...म्हणून खरे अपंग सवलतीपासून राहताहेत वंचित



**खबरबात**
**नितीन देशमुख**

महिन्यापूर्वी पुण्याला गेलो होतो. काम आटपायला उशीर झाला. रात्री मी पनवेलला येण्यासाठी रावतेसाहेबांच्या शिवशाहीने निघालो. आमची गाडी स्वारगेटहून म्हात्रे पूलावरून पुढे आल्यावर चांदणी चौकाकडे जाण्याचा रस्ता चालक पुण्यात नवीन असल्याने दोन-तीन वेळा चुकला. त्यामुळे वाहकाला अनेकवेळा खाली उतरून रस्ता विचारावा लागत होता. गाडीत पुणेकर प्रवासी होते, पण ते रस्ता दाखवण्यापेक्षा गमत बघत होते. रस्ता अरुंद असल्याने गाडी मागे वळवण्यासाठी वाहकाला रस्त्यावर वाहतूक थांबवण्याची कसरत करावी लागत होती. आमच्यासारख्या पुणेकर नसलेल्यांना कोथरूडच्या गल्लीबोळातील गणपती आणि मारूतीचे दर्शन मात्र यामुळे घडले. तासाभराने एकदाची गाडी चांदणी चौकात आल्यावर गाडीतील सर्वांना हुश्श झाले. तेथील आरक्षणाचे प्रवाशी घेऊन गाडी पुढे निघाली. गाडी सुटल्यावर एक माणूस गाडी मागे धावत धावत गाडी थांबवा म्हणून ओरडत होता. आमच्या वाहकाने गाडी थांबवून त्याला गाडीत घेतले. तो माझ्या बाजूलाच येऊन बसला. वाहक तिकीट काढायला आल्यावर त्याने अपंगाचे ओळखपत्र दाखवून सवलतीचे तिकीट घेतले.

थोड्या वेळानंतर मी त्याच्याजवळ गप्पा मारायला सुरुवात केली. त्याला विचारले तुम्ही जन्मापासून अपंग आहात काय? तो म्हणाला नाही हो मोटरसायकलवरून पडलो पायाला थोडेसे फॅक्चर झाले. मग काय आमच्या ओळखीच्या एकाने सांगितले बरे झाले. तुला आता अपंगाचा दाखला मिळवून देतो म्हणजे सवलती मिळतील. थोडेसे पैसे दिले आता सगळ्या सवलती मिळतात. अहो, आमच्या मराठवाड्यात हे तर काहीच नाही माझ्या एका मित्राचे डोळे आले होते. त्यानंतर कमी दिसतय सांगून आंधळ्याचा दाखला घेतलाय. जेव्हा गरज असेल तेव्हा तो नाटक करतो. अहो, पैसे दिले की सगळे मिळते. तुम्ही कोठे राहता तुम्ही रोज प्रवास करीत असाल तर तुम्हाला ही अपंगाचा दाखला मिळवून देतो. अहो एकदा दाखला मिळाला की कोण बघतोय. आता बघा मला एसटीत तिकीटासाठी २५ टक्केच द्यावे लागतात आणि पुन्हा राखीव जागा. मी एका कुरियर कंपनीत काम करतो रोज त्यांचे टपाल घेऊन जात असतो. कंपनीचा पगार मिळतो. शिवाय तिकिटाचे पैसे देतात त्यातले वाचतात.

शासनाने दिव्यांगांना सवलती दिल्याने त्याचा गैरफायदा घेण्यासाठी सिव्हिल सर्जनला पैसे देऊन खोटे अपंगाचे दाखले घेण्यात येत आहेत. या व्यक्तींनाच सगळ्या सवलती मिळत असल्याचे दिसून येत आहे. खरे अपंग मात्र या सवलतीपासून वंचित आहेत. आपल्या रायगडमध्येही असे अनेक जण आहेत की साध्या अपघातानंतर अपंगाचे दाखले घेऊन सगळ्या सवलती घेत आहेत. अपंगांचे दाखले असलेल्यांना पनवेल महापालिकेकडून धंद्यासाठी जागा देण्यात आल्या आहेत. येथे स्वत: धंदा करणे अपेक्षित असताना त्यांनी या जागा भाड्याने दिल्या आहेत. नवीन पनवेलला स्टेशनजवळ एका अपंगांच्या गाळ्यात ऊसाच्या रसवाल्याचा धंदा सुरू आहे. संपूर्ण फुटपाथ अडवून तो आता आजूबाजूच्या जागेवर ही कब्जा करीत असल्याचे दिसत आहे, पण त्याच्यावर कोणतीही कारवाई होत नाही असे दिसत असतानाच प्रत्यक्षात अपंग असलेल्या कित्येकांना अपंगत्वाचा दाखला मिळण्यासाठी खूप अडचणी येतात.

महात्मा गांधी तंटा मुक्त गाव योजनेच्या वेळी तळा तालुक्यातील एका अपंग मुलीचे शारीरिक शोषण झाल्याची तक्रार आल्यावर पोलिसांनी मुलाच्या घरच्यांना त्यांच्या भाषेत समजावून तिचे लग्न लावून दिले. मुलाच्या घरच्यांना तिला सवलती मिळतील असे सांगितले होते. त्यावेळी त्या मुलीला साधा अपंगाचा दाखला ही मिळालेला नव्हता. लग्नानंतर एक वर्षानी तिला सवलती मिळवून देण्यासाठी पत्रकार असून मला किती खटपट करावी लागली याचा अनुभव मी घेतला आहे, पण दलाल मात्र पैसे घेऊन सिव्हिल सर्जनचा दाखला लगेच आणून देतात.

मध्यंतरी शासनाने नवीन संगणकीय ओळखपत्र देण्याचे जाहीर केले होते. यामध्ये अपंगत्वाच्या टक्केवारीप्रमाणे या ओळखपत्रांचा रंग वेगवेगळा असणार होता त्याच्यावर सिव्हिल सर्जन व अस्थि रोगतज्ज्ञाची स्वाक्षरी असणार होती. यामुळे खोट्या ओळखपत्रांना आळा बसला असता, पण राजकीय दडपणामुळे ती ओळखपत्रे अद्याप देण्यात आली नसल्याचे समजते. अपंग संघटना ही यासाठी प्रयत्न करताना दिसत नाहीत हेच खरे दुर्दैव आहे.

# महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे



महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व असलेले पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे म्हणजेच पु.ल. देशपांडे एक लोकप्रिय मराठी विनोदी लेखक तसेच शिक्षक, अभिनेते, पटकथालेखक, संगीतकार, नाटककार, कवी, गायक आणि वक्ते ही होते.

पु.ल.देशपांडे यांचा जन्म मुंबईतील गावदेवी या भागात गौड सारस्वत ब्राह्मण कुटुंबामध्ये ८ नोव्हेंबर १९१९ रोजी झाला. त्यांचे आजोबा वामन मंगेश दुभाषी हे एक कवी व साहित्याचे जाणकार होते. त्यांचे बालपण जोगेश्वरी येथील सारस्वत कॉलनीत गेले तसेच त्यांनी पार्ले टिळक विद्यालयात शालेय शिक्षण घेतले. त्यांनी मुंबईतील इस्माईल युसुफ कॉलेजातून इंटर व सरकारी लॉ कॉलेजमधून एलएल.बी. ची पदवी घेतली आणि कलेक्टर कचेरी व प्राप्तीकर विभागात काही काळ नोकरी केली. त्यापूर्वी ते पेट्रोल रेशनिंग ऑफिसमध्ये कारकून आणि ओरिएंटल हायस्कूलमध्ये शिक्षक होते. पुण्याला आल्यावर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमधून बी.ए.आणि नंतर एम.ए. केले.

फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये असताना देशपांडे यांनी नाटकांतून भूमिका करायला सुरुवात केली. १९३७ पासून नभोवाणीवर पु.ल.देशपांडे छोट्या मोठ्या नाटिकांत भाग घेऊ लागले होते. १९४० च्या दशकात त्यांनी साहित्यक्षेत्रात पदार्पण केले. १९४६ साली त्यांचे सुनीताबाईंशी विवाह झाले. १९४७ ते १९५४ या काळात त्यांनी चित्रपटांमध्ये आणि चित्रपटांसाठी काम केले. देशपांडे यांनी संगीत दिले आणि चित्रपटातील गाणीदेखील गायले.

पुलंना घरात खूप वाचन करायला मिळाले तर रेडिओवरील संगीत ऐकायला देखील मिळाले. त्यांच्या घरी संगीताच्या बैठकाही होत असत अशात ते घरीच बाजाची पेटी शिकले. वडिलांच्या मृत्यूनंतर ते संगीत व अन्य शिकवण्या करू लागले. १९५५मध्ये पु.ल.देशपांडे आकाशवाणीत नोकरीला लागले. आकाशवाणीसाठी त्यांनी अनेक श्रुतिका लिहिल्या आणि भाषणे दिली. नंतर ते आकाशवाणीवर प्रमुख नाट्यनिर्माता झाले. बदलीवर दिल्लीला गेले. १९५८ मध्ये पुलंना आकाशवाणीने युनेस्कोच्या शिष्यवृत्तीवर मीडिया ऑफ मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमासाठी लंडनला बीबीसीकडे पाठवले. १९५९ मध्ये देशपांडे भारतातील पहिले दूरचित्रवाणी कार्यक्रम निर्माते झाले. दिल्ली दूरदर्शनवर सुरू झाले त्यावेळचा पहिला कार्यक्रम पुलंनी निर्मिला होता.



## बदलते तंत्रज्ञान

# ऑनलाईन शॉपिंग करताना 'ही' काळजी आवर्जून घ्या!

दिवाळी आली की बहुतेक सगळ्या ऑनलाईन शॉपिंग प्लॅटफॉर्मवर भरपूर डिस्काऊंट्स चालू असतात. अशा सिझनल डिस्काउंटच्या काळात शॉपिंग करणं अनेकदा फायदेशीर असतं पण हे करत असताना आपली फसवणूक होणार नाही याची काळजीही घेतली पाहिजे. ऑनलाईन शॉपिंग हल्ली मुलंही मोठ्या प्रमाणावर करतात. आईबाबांची क्रेडिट कार्ड्स वापरुन मुलांच्या आणि टिनेजर्सच्या शॉपिंगचं प्रमाण वाढत असताना, मोठ्यांबरोबरच मुलांनीही ऑनलाईन फसवणुकीपासून वाचण्यासाठी काय करायचं हे समजून घेतलं पाहिजे.




फेक वेबसाईटमध्ये मूळ खऱ्या वेबसाईटच्या नावात, लोगोच्या डिझाईनमध्ये किंचित बदल केलेला असतो. त्यामुळे वेबसाईट उघडताना, उघडल्यावर आपण ओरिजिनल वेबसाईटवरच आहोत ना हे तपासा. वेबसाईटवरचे कीप मी लॉग्ड इन किंवा रिमेम्बर मी सारखे पर्याय कधीही निवडू नका.


शॉपिंग ॲप किंवा वेबसाईटवर जर एखादा फॉर्म असेल आणि ऑटो फीलअप करा असं म्हणत असेल तर कधीही ऑटो फीलअप करू नका. या फॉर्म्समध्ये काही वेळा तुमचे बँक, क्रेडिट/डेबिट कार्ड डिटेल, सीव्हीव्ही नंबर, खाते क्रमांक या गोष्टीही सेव्ह करण्याची सोय असते. त्यांचा गैरवापर होऊ शकतो.

दिशाभूल करणाऱ्या ऑफर्स उदाहरणार्थ अमेझॉनकडून आयफोन मोफत मिळवण्यासाठी या लिंकला क्लिक करा. अशा प्रकारचा मेसेज आला, तर अगदी मूलभूत प्रश्न स्वतःला विचारा, अमेझॉन कशाला कुणाला आयफोन फुकट देईल? तरीही मोह होतच असेल तर एकदा अमेझॉनच्या साईटवर जाऊन खरंच अशी कुठली ऑफर सुरु आहे का हे तपासा. मागचा पुढचा विचार न करता, काहीतरी फुकट मिळतंय म्हणून गुन्हेगारांच्या गळाला लागू नका.

OTP कधीही कुणाशीही शेअर करू नका. जर समोरची व्यक्ती क्रेडिट किंवा डेबिट कार्डचा जद्धा मागत असेल तर तो तुम्हाला फसवतोय हे लक्षात घ्या आणि सुरू असलेलं संभाषण थांबवा. नंबर ब्लॉक करा. त्या नंबरवरुन आलेल्या लिंक्सवर क्लिक करू नका.

तुम्ही ऑनलाईन तक्रारही नोंदवू शकता. https://cybercrime.gov.in/ या सरकारी साईटवर तुम्ही झालेल्या फसवणुकीची तक्रार नोंदवू शकता.

# भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी



**निमित्त**

लालकृष्ण अडवाणी यांचा आज जन्मदिवस. लालकृष्ण अडवाणींचा जन्म ८ नोव्हेंबर १९२७ रोजी आता पाकिस्तानमध्ये असलेल्या कराची येथे झाला. लालकृष्ण अडवाणी भारतीय जनता पार्टीचे संस्थापक सदस्य आणि २००२ ते २००४ पर्यंत भारताचे उपपंतप्रधान होते. त्यांच्या ९४ व्या वाढदिवसानिमित्त, आपण आज त्यांच्या राजकीय प्रवासाबद्दल अधिक जाणून घेऊया.

लालकृष्ण अडवाणी हे भारताच्या राजकारणातले महत्वाचे राजकारणी आणि भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आहेत. ते भारतीय जनता पक्षाच्या सहसंस्थापकांपैकी एक आहेत. ते उजव्या विचारसरणीच्या हिंदू राष्ट्रवादी संघटनेचे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दीर्घकाळ सदस्य आहेत. २०१५ मध्ये त्यांना भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान पद्मविभूषण देऊनही सन्मानित करण्यात आले होते.

लालकृष्ण अडवाणी यांचा जन्म किशनचंद डी. अडवाणी आणि ग्यानी देवी यांच्या पोटी कराचीमध्ये ८ नोव्हेंबर १९२७ रोजी सिंधी हिंदू उद्योगपती कुटुंबात झाला. त्यांनी आपले प्रारंभिक शिक्षण सेंट पॅट्रिक्स हायस्कूल, कराची, सिंध येथून घेतले आणि नंतर सरकारी महाविद्यालय हैदराबाद, सिंधमध्ये प्रवेश घेतला. लालकृष्ण अडवाणी वयाच्या १४ व्या वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सामील झाले आणि कराची शाखेचे प्रचारक (पूर्णवेळ कार्यकर्ता) बनले आणि तेथे विविध शाखा देखील विकसित केल्या. फाळणीनंतर ते आपल्या कुटुंबासह भारतात स्थलांतरित झाले आणि मुंबईत स्थायिक झाले जेथे त्यांनी बॉम्बे युनिव्हर्सिटीच्या सरकारी लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि तेथून कायद्याची पदवी घेतली. फाळणीनंतर अडवाणींना अलवर, राजस्थान येथे पाठवण्यात आले. अलवर व्यतिरिक्त त्यांनी भरतपूर, कोटा, बुंदी आणि झालावाड जिल्ह्यातही काम केले. त्यांनी के. आर. मलकानी यांना आरएसएस साप्ताहिक, ऑर्गनायझरच्या संपादनातही मदत केली.

लालकृष्ण अडवाणी भारतीय जनता संघ श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सहकार्याने स्थापन केलेल्या भारतीय जनसंघात अडवाणी सामील झाले. लालकृष्ण अडवाणी यांची राजस्थानमधील जनसंघाचे तत्कालीन सरचिटणीस एसएस भंडारी यांच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली होती. संसदीय कामकाज पाहण्यासाठी त्यांना दिल्लीत हलवण्यात आले आणि लवकरच ते सरचिटणीस आणि नंतर जनसंघाच्या दिल्ली युनिटचे अध्यक्ष बनले.

लालकृष्ण अडवाणी यांनी १९९० मध्ये गुजरातमधील सोमनाथ ते उत्तर प्रदेशातील अयोध्येपर्यंत 'रथयात्रा' सुरू केली. यात्रेचा उद्देश 'कारसेवक' किंवा स्वयंसेवकांना एकत्र करणे हा होता. २००९च्या निवडणुकीसाठी, लालकृष्ण अडवाणी यांना भारतीय जनता पक्षाने पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून नियुक्त केले होते. कारण ते वाजपेयींनंतर भाजपचे सर्वांत शक्तिशाली नेते होते. २०१० मध्ये त्यांची एनडीएचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

२०१४ मध्ये, लालकृष्ण अडवाणी मुरली मनोहर जोशी आणि अटलबिहारी वाजपेयी यांच्यासह भारतीय जनता पक्षाच्या मार्गदर्शक मंडळात सामील झाले. आता त्यांनी पक्षाच्या सर्व राजकीय घडामोडीपासून अलिप्तता घेतली असली तरी भारतीय जनता पक्षाची रुजवात करणारे नेते म्हणून आजही त्यांच्याकडे मोठ्या आदराने पहिले जाते.

**(साभार : ज्ञानशाळा)**

**क्लिक...क्लिक...!**



पनवेल : दिवाळी म्हणजे दिव्यांचा सण. त्यानिमित्त बाजारपेठेमध्ये आकर्षक दिवे विक्रीसाठी आले आहेत. (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर



# अति प्रमाणात कॉफी घेत असाल तर होईल नुकसान

बहुतेक लोकांना कॉफी प्यायला भरपूर आवडते. मग सकाळी उठल्यानंतर, कामात कंटाळा आल्यानंतर, मित्र मैत्रिणींसोबत गप्पा मारताना कॉफीचा आस्वाद आवर्जून घेतला जातो. तसंच कॉफी ही आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर मानली जाते. कॉफीमध्ये कॅफिन आढळते जे मेंदूच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. असे असले तरी कोणत्याही पदार्थाचे अतिरिक्त सेवन केल्याने आरोग्यावर दुष्परिणाम होतात तसेच कॉफिचे जास्त सेवन घातक आहे.

तुम्ही जर एंग्जायटी विकाराने त्रस्त असाल तर कॉफीचे सेवन करू नका. कारण अशा लोकांनी जास्त प्रमाणात कॉफी प्यायल्यामुळे त्यांना आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांचा सामना करावा लागू शकतो. तसेच अशा लोकांना पॅनिक अटॅकचा देखील धोका असू शकतो. त्यात तुम्ही जर कॉफीचे जास्त प्रमाणात सेवन केले तर तुम्हाला अस्वस्थतादेखील निर्माण होऊ शकते. त्यामुळे एंग्जायटी असलेल्या लोकांनी कॉफी जास्त प्रमाणात पिऊ नये.

जेव्हा तुमच्या शरीरातील हाडे कमकुवत होतात तेव्हा या स्थितीला ऑस्टिओपोरोसिस असं म्हणतात. ज्यामुळे हाडे फ्रॅक्चर होण्याचा धोका वाढतो. तसंच जर तुम्ही जास्त प्रमाणात कॉफी पीत असाल तर त्याचा तुमच्या हाडांवर नकारात्मक परिणाम होण्यास सुरुवात होते. त्यामुळे ज्यांना ऑस्टिओपोरोसिसचा त्रास आहे अशांनी जास्त प्रमाणात कॉफी पिऊ नये.

गरोदर असलेल्या स्त्रियांनी कॉफी पिऊ नये. तसेच डॉक्टर देखील गरोदर स्त्रियांना कॉफी न पिण्याचा सल्ला देतात. ज्यांना जास्त कॉफी आवडत असेल अशा गरोदर स्त्रियांनी अगदी कमी प्रमाणात कॉफीचे सेवन कराव. कारण २०० मिलिग्रॅम पेक्षा जास्त कॉफी पिणे त्यांच्या मुलांसाठी हानिकारक ठरू शकते. त्यामुळे कॉफी गरोदरपणा पिऊ नये. तसेच गरोदरपणात कॉफी प्यायल्यामुळे बीपी देखील वाढू शकतो, त्याच्यामुळे गरोदर स्त्रियांनी कॉफी पिणे टाळावे.

# आठवडा बाजारासाठी जागा उपलब्ध करून देणार

## रोहा मुख्याधिकारी पंकज भुसे यांचे आश्वासन



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील महिलांनी दीपावलीच्या पूर्वसंध्येला फराळ, शोभिवंत वस्तू, गृहोपयोगी वस्तू बनवून स्पंदन नाट्यसंस्था आयोजित महिला उत्कर्ष मेळाव्यात विकण्यासाठी आणल्या आहेत. प्रत्येक सणासुदीला किंवा इतरही वेळी व्यवसायासाठी संधी मिळावी म्हणून या महिलांसाठी आठवडा बाजारासाठी जागा उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन रोहा अष्टमी नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी व्यक्त केले.

स्पंदन नाट्यसंस्थेच्या वतीने मंगळवारी (दि. ७) आयोजित महिला उत्कर्ष मेळाव्याचे उद्घाटनाच्या वेळी ते बोलत होते. या वेळी स्पंदन नाट्य संस्था अध्यक्ष स्नेहा अंबरे, सचिव प्रतीक राक्षे, ज्येष्ठ नेते व्ही. टी. देशमुख, लीलाधर थोरवे, मधुकर वाघमारे, अलका नांदगावकर, ज्योती तेंडुलकर, मुक्ता राक्षे, माधवी मोरे, रेखा खटावकर, प्रियांका कांबळे व महिला उद्योजिका उपस्थित होत्या.

माजी नगरसेविका स्नेहा अंबरे यांनी सांगितले की, गेली १६ वर्षे रोह्यातील महिलांना हक्काचे व्यासपीठ देण्याचा स्पंदन नाट्य संस्थेकडून प्रयत्न केला जात आहे. दरवर्षी दिवाळीपूर्वी महिला उत्कर्ष मेळाव्यात तीन दिवस या महिला स्वतः उत्पादित केलेला माल विकतात, मात्र वर्षाच्या १२ महिने त्यांनी बनविलेला मालाला बाजारपेठ उपलब्ध करण्यासाठी नगर परिषदेने जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली.

## मोर्बा निवडणुकीत शेकाप, ठाकरे गटाचा धुव्वा

**माणगाव : प्रतिनिधी**



तालुक्यातील मोर्बा ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने अल्ताफ धनसे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवून घवघवीत यश संपादन केले आहे.

मोर्बा ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी थेट जनतेतून राष्ट्रवादीचे मोर्बा विभागीय अध्यक्ष शौकत रोहेकर हे विजयी झाले असून १७ सदस्यांपैकी ११ जागांवर विजय संपादन केला. सहा वेळा ग्रामपंचायतीवर सत्ता असणाऱ्या शेकापचा तसेच उद्धव ठाकरे गटाचा धुव्वा उडवून राष्ट्रवादीचा झेंडा फडकाविला. या निवडणुकीत खासदार सुनील तटकरे व मंत्री आदिती तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली नेतृत्व करीत येथील अल्ताफ धनसे यांनी आपली किमया दाखवून शेकापची सत्ता उलटवून टाकली.

विजयी उमेदवारांची संपूर्ण गावातून वाजत-गाजत मिरवणूक काढून आपल्या मतदार बांधव-भगिनींचे आभार मानले.

## मुरूड पंचक्रोशीत भातकापणीला सुरुवात



**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील ३३०० हेक्टर क्षेत्र भातपिकाखाली असून या वेळी शेतकऱ्यांनी ३००० हेक्टरात भातपीकासाठी सुवर्णा, रूपाली, शुभांगी, कर्जत, चिट्टु, साई, जया आदींसह पिकांची लागवड केली होती. या वर्षी वरूणराजाच्या कृपादृष्टीमुळे शेतामध्ये समाधानकारक पाऊस पडल्याने मोठ्या प्रमाणात पीक आले आहे. आता पंचक्रोशीत भातकापणीला सुरुवात झाली आहे.

मुरूडमध्ये जणू सोनेरी शाल परिधान केलेली दिसून येत आहे. चार महिने अथक परिश्रम घेऊन बळीराजाला आता भाताचा दाणा पहावयास मिळाला आहे. यामुळे शेतकरी आनंदीत झाला होता.

शेतकऱ्यांकडून भातकापणी व झोडणीच्या कामांना सुरुवात करण्यात आली. आता सर्वच ठिकाणी झोडणीची लगबग दिसून येत आहे. शेतीच्या कामासाठी आवश्यक मंजुरही मिळत नसल्याने थोडी तारांबळ उडत आहे तरीही शेतकरी राजा झोडणीच्या कामात मग्न आहे.

तालुक्यात आतापर्यंत ६५ टक्के भातकापणी झाली आहे. काही ठिकाणी खारजमीन असल्याने त्या ठिकाणी भातकापणी झाली नाही. तिथेही लवकरच भातकापणीला सुरुवात होईल, अशी माहिती कृषि अधिकाऱ्यांनी दिली.

## महावितरणच्या बेजबाबदारपणामुळे पेणमध्ये तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

### दादर गावातील घटना; आणखी तिघांनाही लागला शॉक

**पेण : प्रतिनिधी**

दादर गावचा तरूण संदेश गोरख पाटील (वय ४५) हा आपल्या भावंडासह सोमवारी (दि. ६) सकाळी ९:३० वा. च्या सुमारास रावे खोकरी या ठिकाणी चिंबोरी पकडण्यासाठी जात असताना गवतात पडलेल्या विद्युत प्रवाहित तारेला धक्का लागून जागीच मृत्यू झाला. यामध्ये महावितरणची चूक त्यांनी संदेशच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.



याविषयी सविस्तर वृत्त असे की, दादर गावामध्ये अनेक तरुण उदनिर्वाहासाठी मासेमारी करण्यास दादर रावे खाडीमध्ये जात असतात. रोजच्याप्रमाणे संदेशसह भालचंद्र पाटील, संतोष पाटील, पद्माकर घरत असे चिंबोरी पकडण्यासाठी दादर गावाला लागून असलेल्या रावे खोकरी याठिकाणी गेल्यानंतर संदेश गवतात कोलमडून पडला. त्याला काय झाले हे मागे असणाऱ्या तिघांना समजले नाही. त्यातील एक जण पुढे सरसावला. त्याच्या पायात गमबूट असल्याने तो वाचला. त्याला किरकोळ विजेचा धक्का लागून तो कोलमडून पडला. हा सर्व काय प्रकार होतोय हे पाहण्यासाठी इतर दोघे धावत आले. जिवंत विजेची तार गवतात पडल्याचे त्यांच्या लक्षात आले.

याविषयी दादर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी पंचनामा केला असून अधिक तपास पोलीस निरिक्षक अजित गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. तहसीलदार स्वप्नालि डोईफोडे यांनी तलाठ्यांना तातडीने पंचनामा करण्याचे आदेश दिले आहेत.

जिवंत विद्युत तार गवतात पडणे ही महावितरणची चूक आहे. आज त्यांच्या बेजाबदारपणामुळे आमचा भाऊ आम्हाला सोडून गेला. त्याच्या कुटुंबाच्या व मुलांच्या पुढील भवितव्यासाठी महावितरण कंपनी व शासनाने भरपाई द्यावी अशी मागणी भालचंद्र पाटील यांनी केली.

## भाजपतर्फे मोफत नेत्रचिकित्सा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि आरोग्य तपासणी शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**





कर्जत भाजपच्या वतीने सेवा ही संघटन मानून सुनील गोगटे यांच्या जनसेवा कार्यालयात मोफत नेत्रचिकित्सा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन मंगळवारी (दि. ७) करण्यात आले होते.

शंकरा आय हॉस्पिटल आणि श्रीपाद आयुर्वेदिक क्लिनिक यांनी तपासणी केली. ११७ लोकांनी याचा लाभ घेतला. यात १४ लोकांना मोतिबिंदू आढ़ळला. त्यातील नऊ जणांना शंकरा आय हॉस्पिटल येथे शस्त्रक्रियेसाठी नेले, तसेच काही जणांना मधुमेह, गुढगेदुखी आढळली. त्यांना औषधे देऊन उपचार करण्यात आले.

या वेळी सुनिल गोगटे, सरचिटणीस सूर्यकांत गुप्ता, महिला मोर्चा शहराध्यक्ष शर्वरी कांबळे, चिंचवली ग्रामपंचायत सदस्य सुप्रिया भगत, महिला मोर्चाध्यक्ष स्नेहा गोगटे, सोनाली जाधव, राधा बहुतुले, गीता कदम, पुनम डेरवणकर, तालुका आयटी सेल बिराज पाटकर, अनुसूचित जाती मोर्चा तालुका अध्यक्ष गणेश गवई, युवा मोर्चा शहर अध्यक्ष सर्वेश गोगटे, रवींद्र जाधव, दर्पण घारे, अजिंक्य भुंडेरे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.


**पोळ मेडिकल्स**

केवाळे, न्यु पनवेल,जि. रायगड येथे रजिस्टर फार्मासिस्ट पाहिजे

संपर्क. क्र ९३५६२७८४३७,९०११६८४२६५


## कुडगाव येथे सुदृढ बालक स्पर्धा

**मुरूड : प्रतिनिधी**

अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड अंतर्गत ग्रामपंचायत कुडगाव येथील एकात्मिक बालविकास सेवायोजना विभाग अंतर्गत कोळीवाडा अंगणवाडी क्र. १, कोळीवाडा अंगणवाडी क्र. २ आणि कुणबीवाडी अंगणवाडी येथे सुदृढ बालक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत बालकाचा विकास कशाप्रकारे असावा व ते सुदृढ कसे बनवावे हा संदेश पोहचवा म्हणून या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. या कार्यक्रमांतर्गत अंगणवाडीमधील सहा महिने ते सहा वर्षापर्यंत सर्व बालकांचे वजन उंची व दंडघेर मोजण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये कुडगाव १०८ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. बालकांच्या विविध तीन गटांमध्ये स्पर्धा घेऊन उत्कृष्ट बालकांची निवड करण्यात आली व एकूण २९ सुदृढ बालकांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाला कुडगाव ग्रामपंचायत सरपंच प्रमिला मेंदाडकर, उपसरपंच मुश्तरी हवालदार, अदानी फाउंडेशन च्या जयश्री काळे, अवधूत पाटील, अंगणवाडी सेविका ममता खरगावकर, ललिता पड्याळ, रेश्मा पवार, मदतनीस रसिता पड्याळ, ग्रामपंचायत कर्मचारी व पालकवर्ग उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंगणवाडीसेविका ललिता पड्याळ यांनी केले व अदानी फाउंडेशनच्या काळे यांनी बालकांच्या पोषण विकास, गरोदर मातांची काळजी, लहान बालकांचे पोषण याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले आणि पालकांनी आपल्या बालकांच्या पोषण विकास करण्यासाठी सक्रियतेने सहभाग घेऊन विकास घडवावा, असे सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन ग्रामसखी सुप्रिया चव्हाण, प्रज्ञा जाधव व नम्रता दिघीकर यांनी केले.




**महाराष्ट्र शासन**

सहकार विभाग

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. खालापूर यांचे कार्यालय**

**सोमेश्वर को.ऑप.हौ. सो. पहिला मजला, खालापूर ता. खालापूर, जि. रायगड**

**जाहिर नोटीस**

दावा क्रमांक ५/२०२३-२४ कलम १०१/ नोटीस/२०२३-२४

जा.क्र. ३४० दिनांकः ०७/११/२०२३

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल** — **वादी**

**विरूद्ध**

१) श्री. इरफान अकबर कुरेशी
रा. श्रीरामनगर लौजी, रेल्वेस्टेशन जवळ
पो- शिळफाटा, ता. खालापूर.
जि. रायगड, ४१०२०३

२) श्री. शफिक मगबूल कुरेशी
रा. खालची आळी,मशीदजवळ,
यशवंतनगर, शिळफाटा,
ता. खालापूर, जि. रायगड ४१०२०३

३) श्री. रविंद्र कोंडीराम पाटील
रा.घर.नं. २६५. ग्रामपंचायत ऑफिसच्या
मागे साजगाव, पो. साजगाव,
ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०६

४) श्री. अशपाक हसन मणियार
रा. मशीदजवळ, सांगडे गाव, पो. देवन्हावे,
ता. खालापूर, जि. रायगड ४१०२०३

— **जाब देणारे**

**दावा रुपये ५७,०७७/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दि.०१/०८/२०२३ रोजी महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये दावा या कार्यालयात दाखल केला आहे. यानुसार प्रतिवादी यांना वेळोवेळी नोटीसा देवूनही त्याची बजावणी होऊ शकली नाही त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. २०/११/२०२३ रोजी दुपारी ठोक २.३० वाजता सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, खालापूर, सोमेश्वर को. ऑप. हौ.सो. पहिला मजला, ता. खालापूर, जि. रायगड येथे हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुउपस्थित दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा गुणवत्तेनुसार निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखेस अगर तत्पुर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२३ रोजी माझी सही व मुद्रेसह दिले असे.

शिक्का

**सही/-**
**( एस.एन. कुलकर्णी)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था खालापूर, रायगड**



**जाहिर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमिन मिळकती आमचे अशिलांने प्रस्ताविक जमीन मालक अशोक गोविंद सावंत या जमीन मालकाकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमिन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर शेत मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे वांवढळ, तालुका खालापुर, जिल्हा रायगड**

| गावाचे नाव | स.नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| वांवढळ | ८८/१/ड | ०-२०-६०<br>पो.ख. ०-०२-८०<br>एकूण ०-२३-४० | १.०० |
| वांवढळ | ८८/१/ई | ०-१७-४०<br>पो.ख. ०-०३-८०<br>एकूण ०-२१-२० | ०.९४ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर, कोणीही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहान दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे,मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधीतांचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा, न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती, या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल,
दिनांक : ०७/११/२०२३

**सही/**
**ॲड. श्री. दिपक आर. शेळके**

पत्ता : डी ३/१ किनारा हौ.सो.टी बावन बंगलो ता. पनवेल, जि. रायगड. मो. नं. ९८२०७९५६०५.



**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ८५ सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वडशेत वावे, कोंडे तर्फे श्रीवर्धन ते प्रा.जि.मा. ७३ मार्ग तयार करणे. ग्रा.मा. २६ तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (कि.मी. ०/०० ते ४/००) | ६८५०५४० | ६९००० | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| २ | प्रा.रा.मा. ४ ते बापवन गाणी ते प्रा.जि.मा ३७ मार्ग तयार करणे. ग्रा.मा. २५ तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (कि.मी. ००/०० ते ४/५००) | ६८४९०८३ | ६९००० | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ३ | खरसई बनोटी कोड ते रा.मा. ९८ ला जोडणारा रस्ता डांबरीकरण करणे. ग्रा. मा. ७ तालुका म्हासळा, जिल्हा रायगड. (कि.मी. ००/०० ते १/२००) | ६४७४१७१ | ६५००० | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ४ | कोडे पंचतन ते बोली पंचतन इ.जि.मा. १२० रस्ता डांबरीकरणे करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड ( कि.मी. ०० /०० ते १/८००) | ५३१३००४ | ५४००० | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ५ | कोकबल कातळकोड रस्ता तयार करणे. ग्रा. मा. ४० मार्ग तयार करणे तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. (कि.मी. ००/०० ते २/००) | ५३२८५०९ | ५४००० | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ६ | कोकबल पानदरे मार्ग सा.का. २/०० ते ४/२०० ग्रा.मा. ३२ मार्ग तयार करणे तालुका म्हासळा, जिल्हा रायगड . | ४५५११२३ | ४६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७ | पाभरे विठ्ठलवाडी रस्ता तयार करणे. ग्रा.मा. ७९ मार्ग तयार करणे तालुका म्हसळा, जिल्हा रायगड (कि.मी. ००/०० ते १/००) | ३०५६७१६ | ३१००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ८ | चिंचोदे गायरोणे ते कुडतुडी मार्ग ग्रा.मा. ५३ सा.का. १/०० ते २/५०० मार्ग तयार करणे तालुका म्हासळा, जिल्हा रायगड. | ३०४१६८० | ३१००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ९ | आंबेत सावंतवाडी बौध्दावाडी मार्ग सा.का. ०/०० ते १/०० ग्रा.मा. ४१ मार्ग तयार करणे तालुका म्हासळा, जिल्हा रायगड. | २२८३९८१ | २३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १० | प्रा.जि.मा. ५७ ते खुजारे वांजळे सा. क्रा. २/०० ते ३/०० ग्रा.मा. ७ तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | २२९३१२५ | २३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ११ | म्हसळा ते सावर मार्ग सा.क्रा. ०/०० ते १/०० ग्रा.मा. १८ मार्ग तयार करणे. तालुका म्हासळा, जिल्हा रायगड. | २२७९८७५ | २३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १२ | रा.मा. ९८ ते भावे खारशेत सा.क्रा. ०/५०० ते १/५०० ग्रा.मा.६ तयार करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | २२७४९८६ | २३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १३ | खरसई जोडमार्ग ग्रा.मा. ९३ चे डांबरीकरण करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. (कि.मी. ०० /०० ते ०/८००) | १९१०३९० | २०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १४ | दिवेआगर शिवाजी चौक ते मोहल्ला रस्ता (गणपती मंदिरासमोरील रस्ता) सा.क्रा. ०/०० ते ०/७५० ग्रा.मा. ८२ तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | १९०७८८६ | २०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १५ | भेकरीचा कोड जोडमार्ग ग्रा.मा. ५० सा.क्रा. ०/०० ते १/०० मार्ग तयार करणे. तालुका म्हासळा, जिल्हा रायगड. | १५२३०३८ | १६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०८/११/२०२३** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१५/११/२०२३** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. **१७/११/२०२३** वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५१६३**
**दिनांक : ०८/११/२०२३**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# शालेय जीवनातच ध्येयनिश्चिती करा

## 'रयत'चे अरुणशेठ भगत यांचे विद्यार्थ्यांना आवाहन | गव्हाण विद्यालयात दहावी बोर्ड परीक्षा फॉर्म भरण्यास शुभारंभ





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातच आपल्या भविष्यकालीन ध्येयाची निश्चिती करून त्याप्रमाणे मार्गक्रमण करावे असे आवाहन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांनी केले. संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील एस.एस.सी.बोर्ड परीक्षा मार्च २०२४ ला प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे आवेदन पत्र भरण्याच्या कार्यक्रमाच्या शुभारंभीय समारंभाच्या अध्यक्ष पदावरून बोलताना अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना मार्गदर्शन केले.

या वेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रातिनिधीक स्वरूपात विद्यार्थ्यांना आवेदन पत्र सुपूर्द करणे व भरण्याचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमास गव्हाण ग्रामपंचायतचे उपसरपंच विजय घरत, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेवराव ठाकूर तसेच विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, इयत्ता दहावी अ,ब आणि क या तिन्ही वर्गांचे वर्गशिक्षक अनुक्रमे चित्रलेखा पाटील, सागर रंधवे व संदीप भोईर, लेखनिक चंद्रकांत मढवी आणि विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले.

### दोन शिक्षकांना भाजप शिक्षक सेलचा पुरस्कार

'रयत'चे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर आणि ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे या दोघांना भारतीय जनता पार्टीच्या शिक्षक सेलच्या वतीने कोकण विभाग स्तरावरील वसंत स्मृती शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. या पुरस्काराचे श्रेय अरुणशेठ भगत यांना देत रवींद्र भोईर यांनी अरुणशेठ भगत यांना हा पुरस्कार समर्पित केला.

# कमिशनचे आमिष दाखवून फसवणूक करणारा ताब्यात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

टेलिग्रामद्वारे लोकांशी संपर्क साधून विविध बेबसाइटवरील टास्क पूर्ण करण्याचे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या आरोपीस नवी मुंबई पोलिसांनी पुण्यातून अटक केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे आरोपी सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाउंटंट) असून एका खाजगी कंपनीत उच्च पदस्थ अधिकारी आहे. आकाश उमेश पांडे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. ९ ऑगस्ट रोजी नवी मुंबईतील फिर्यादी टेलिग्रामद्वारे आरोपीच्या संपर्कात आले.

फिर्यादींना विविध वेबसाईट वरिल टास्क पूर्ण केले नंतर जास्तीचे कमिशन मिळवून देण्याचे आमिष दाखवत वेगवेगळ्या बँक खात्यांवर ऑनलाईन पध्दतीने टप्याटप्याने पैसे भरण्यास सांगितले. मोठे कमिशन मिळेल या आशेपायी त्यांनी एकूण १७ लाख ६२९ रुपये भरले, मात्र पुढे काहीच झाले नाही आणि संपर्कही बंद झाला. त्यामुळे फिर्यादी यांनी नवी मुंबई सायबर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. गुन्हयात वापरलेले बँक खाते व मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण करून संशयीत इसमाचे लोहगाव, पुणे येथे वास्तव असल्याची माहिती प्राप्त झाली. सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजु आलदर व पथक यांनी लोहगाव, पुणे येथे जाऊन आरोपीताचा शोध घेवून त्यास ताब्यात घेतले व चौकशी केली असता आरोपीने गुन्हा कबूल केला.



### आरोपी कंपनीमध्ये चार्टर्ड अकाउंटंट

*आरोपीचा महाराष्ट्र राज्यामधील ०४ तसेच इतर राज्यातील २१ सायबर तक्रारीत सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपी हा मुळचा पश्चिम बंगाल येथील राहणारा असून उच्चशिक्षीत आहे. लोहगाव, पुणे येथे चांगल्या कंपनीमध्ये चार्टर्ड अकाउंटंट म्हणून काम करत होता.*

# फटाक्यांच्या किमतीमध्ये वाढ; खरेदीही मंदावली

**पनवेल : वार्ताहर**

दिवाळीच्या आनंदोत्सवात आसमंत उजळून टाकणाऱ्या आतषबाजीला यंदा महागाईचा फटका बसला आहे. कारण विविध प्रकारच्या फटाक्यांच्या किमतीमध्ये १० ते १५ टक्क्यांची वाढ झाल्याने यंदा दिवाळीत खिशाला झळ बसणार आहे.

आठवड्यावर आलेल्या दिवाळीच्या तयारीला वेग आला आहे. खरेदीसाठी बाजारपेठा गर्दीन फुलल्या आहेत. यंदा नागरिकांमधील उत्साह लक्षात घेता फटाक्यांची विक्री वाढून मोठी उलाढाल



होण्याची शक्यता वर्तवली आहे. अशातच एकीकडे फटाके निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतींमध्ये वाढ झाली आहे; तर दुसरीकडे वाढलेली मजुरी, वाहतुकीचा वाढलेला खर्च, विजेचे दर या सर्व बाबींमुळे फटाक्यांच्या दरांमध्ये सरासरी १५ ते २० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. त्यामुळे किरकोळ नफा ठेवूनच यंदा फटाके विकावे लागणार असल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. दिवाळीत लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच फटाके फोडण्याचा मोह होतो.

सध्या बाजारात ध्वनिप्रदूषण टाळण्यासाठी कमी आवाजाच्या फॅन्सी फटक्यांना अधिक मागणी आहे. त्यामुळे यंदा बाजारात रंगीबेरंगी कमी आवाजाचे आणि आकाशात फुटणाऱ्या फटाक्यांना मागणी आहे. बाजारात अशा फटाक्यांचे हजारपेक्षाही अधिक प्रकार उपलब्ध आहेत.

# नवी मुंबईत अमली पदार्थ विकणाऱ्याला अटक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील कोपरी गाव परिसरात एम.डी. हा अंमली पदार्थ विकताना एका व्यक्तीस अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून पाच लाख ११ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला असून हि कारवाई एपीएमसी पोलिसांनी केली आहे.

सोएब मोहम्मद सलीम अन्सारी असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



कोपरीगाव सेक्टर २६ येथे हनुमान मंदिराच्या मागच्या बाजूस एक इसम संशयास्पद वावरताना पोलीस हवालदार सुनील पाटील यांना आढळून आला.

त्याची चौकशी केली असता त्याच्या बॅगेत ५ लाख १० हजार रुपये किंमतीचे एमडी व तसेच १ हजार २०० रुपये रोख रक्कम आढळून आल्याने आरोपी सोएब मोहम्मद सलीम अन्सारी (वय २१ वर्ष रा. गोवंडी) याला ताब्यात घेतले असून सदरचे अमली पदार्थ त्याने कुठून आणले व कोणाला विकणार याचा तपास तुर्भे एपीएमसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रभाकर शिउरकर करत आहेत, अशी माहिती एपीएमसी पोलिसांनी दिली.

# दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईत वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उपाययोजना

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

दिवाळीच्या खरेदीसाठी एपीएमसी बाजारपेठेतील दुकाने आणि लगतच्या परिसरातील दुकाने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात ग्राहकांची ये-जा असते. त्यामुळे प्रत्येक सणाच्या कालावधीत या परिसरात वाहतुकीची वर्दळ असते. या वेळी वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून नेहमी प्रमाणे याही वर्षी वाहतूक पोलिसांकडून विविध उपाययोजना राबवल्या जात आहेत. यासाठी खरेदीदार अर्थात ग्राहक आणि व्यापारी यांनी सहकार्य करावे, असे आवाहन एपीएमसी वाहतूक शाखेच्या पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी केले आहे. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या आदेशाने आणि





पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यवाही करण्यात येत आहे.

एपीएमसी पोलीस आणि एपीएमसी वाहतूक शाखेच्या अंतर्गत आशिया खंडातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पाच बाजारपेठा तुर्भे येथे आहेत. या बाजारपेठांच्या लगत बँका, वाहतूकदार आस्थापना आणि शेतमालाशी संबंधित अन्य आस्थापना आहेत.

संपूर्ण नवी मुंबई, ठाणे, रायगड येथून घाऊक आणि किरकोळ खरेदीदार त्यांची वाहने घेऊन या बाजारपेठेत येतात. तसेच पूर्ण खरेदी होईपर्यंत वाहन कुठेही तास न तास पार्क करून ठेवतात. त्यामुळे या परिसरात वाहतूक सुरळीत ठेवण्याचे मोठे आव्हान असते. यासाठी त्यात रस्त्यात पार्किंगच्या २ रांगा लावणाऱ्याना वाहन चालकांना वाहने रस्त्यातून काढण्याकरिता वाहतूक पोलीस उद्घोषणा करतात. प्रसंगी जॅमरची कारवाई करणे भाग पडते.

सहाय्यक पोलीस आयुक्त बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मार्केट मधील गर्दी टाळण्याकरिता या वर्षी मार्केट परिसरातील जे दुकानदार त्यांच्य दुकाना समोरील रस्त्यावर साहित्याचे टेम्पो सतत लावून ठेवतात, त्यांना नोटीस देऊन समजून सांगण्यात आले आहे. या वाहनामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यानुसार अनेक व्यापाऱ्यांनी सहकार्य करत त्यांची साहित्याची वाहने स्वतः हुन पार्किंगच्या ठिकाणी लावली आहे.

सध्या रस्ता आणि पदपथ यांवर दिवाळीचे साहित्य विक्रेते बसले आहेत. त्यावर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून कारवाई केली,तर आणखी वाहतूक सुरळीत राहण्यास सहाय्य होईल, असे विमल बिडवे यांनी सांगितले. या विषयी तुर्भे विभाग अधिकारी भरत धांडे यांना पत्र पाठवले आहे.

ग्राहकांनी एपीएमसी परिसरात खरेदीसाठी आल्यास त्यांना पुढील नेमून दिलेल्या जागेवरच वाहने पार्क करावी,असे बिडवे यांनी केले आहे. अन्नपुर्ण चौक ते मसाला मार्केट, माथाडी चौक ते पुनित कॉर्नर, माथाडी चौक ते अक्षर बिल्डींग या ठिकाणी वाहने पार्क करून वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दीपावलीनिमित्त खरेदीसाठी बाजारपेठेत झुंबड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दीपोत्सवाची तयारी सर्वत्र सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी पनवेलमधील बाजारांत प्रचंड गर्दी पाहायला मिळाली. उत्सव सुरू होण्यापूर्वीचा शेवटचा रविवार असल्याने नागरिक मोठ्या संख्येने बाहेर पडले होते. त्यामुळे येथील बाजारपेठेत पाय ठेवायलाही जागा नसल्याचे दिसून येत होते.

दिवाळी आणि खरेदी हे समीकरण अजूनही कायम असल्यामुळे सध्या शॉपिंग मॉल्स, शॉपिंग स्ट्रीट्स भरून गेलेली दिसत आहेत. विशेष म्हणजे आकर्षक रोषणाई आणि झगमगाटासह दीपावली सण साजरा करण्यासाठी बाजारात विविध प्रकारच्या पणत्या, दिवे, कंदील, विद्युत तोरण, फुलांचे तोरण उपलब्ध आहेत.

दिवाळीच्या खरेदीसाठी नागरिकांनी यंदा होलसेल बाजाराला पसंती दिल्याचे दिसून आले. टपाल नाका, उरण नाका, मार्केट यार्ड, जुने भाजी मार्केट, या भागांतील बाजारपेठेतील दुकानांमध्ये ग्राहकांची झुंबड उडाली होती. रविवारची सुटी साजरी करताना सर्वांच्या पसंतीने खरेदी करण्याकडे नागरिकांचे विशेष लक्ष आहे. त्यासाठी संपूर्ण परिवार बाजारपेठांमध्ये दाखल झाल्याचेही दिसून येत होते. आकश कंदील, कपडे, फटाके यांची खरेदी लहानग्यांच्या पसंतीने करण्याकडे अनेकांचा कल आहे.

फुलांचे, कापडी, विविध रंगांतील चांदण्या, आकर्षक रंगसंगतीच्या झिरमिळ्या लावलेले आकाश कंदील



बाजारपेठेत ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. कापडी आणि लाकडी आकाश कंदिलांमध्ये अनेक पर्याय उपलब्ध असून त्यांचे दर २०० रुपयांपासून ते दोन हजार रुपयांपर्यंत आहेत.

दिवाळीनिमित्त बाजारात खऱ्याखुऱ्या वाटणाऱ्या आर्टिफिशियल मेणबत्त्या दाखल झाल्या आहेत. बॅटरीवर चालणाऱ्या या मेणबत्त्यांना यंदा सर्वाधिक पसंती मिळत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. यात विविध रंग उपलब्ध आहेत. अगदी शंभर रुपयांपासून या मेणबत्त्या उपलब्ध आहेत.

दरम्यान, युवा वर्गाचा ऑनलाईन खरेदीकडे अधिक कल आहे. त्यामुळे बाजारात येऊन खरेदीकडे युवा ग्राहकांनी पाठ फिरवली आहे. यामुळे दुकान खर्च निघणे, अवघड झाले आहे. खरेदीसाठीच्या विविध सवलती कंपन्यांकडून दिल्या जात आहेत.

### मिठाईच्या दुकानांत गर्दी

दिवाळीच्या निमित्ताने मित्र परिवाराला सुकामेवा, काजू कतली, मथुरा पेढा, बर्फी अशी मिठाई देता यावी यासाठी नागरिक मिठाईच्या दुकानांत गर्दी करत आहेत. दुकानदारांनी या मिठाईंना आकर्षक बॉक्समध्ये सजवले असल्याचे दिसून येत आहे. ही मिठाई दोनशे रुपयांपासून हजारो रुपयांपर्यंत उपलब्ध आहे.

**दिवाळीच्या साहित्याची खरेदी करण्यासाठी पनवेलमधील जुने भाजी मार्केट उत्तम पर्याय आहे. येथे प्रत्येक वस्तू होलसेल भावात मिळते, तसेच वेगवेगळे पर्याय उपलब्ध असल्याने खरेदी करणे सोपे जाते. मात्र दिवसेंदिवस वाहनांची वाढती गर्दी यामुळे खरेदी करताना नाहक त्रास सहन करावा लागतो. सणासुदीच्या वेळेत तरी वाहनांचे योग्य नियोजन वाहतूक विभागाने केले पाहिजे.**

**-सुलोचना वीर, ग्राहक**

**पनवेलकरच नव्हे तर ठाणे, नवी मुंबई आदी भागांतील नागरिकांना कमी किमतीत व आकर्षक वस्तूंची खरेदी करण्यासाठी कायमच पनवेल बाजारपेठ महत्त्वाचे ठिकाण आहे. दीपावलीच्या खरेदीसाठी रविवार सुटीचा दिवस असल्याने आम्ही कल्याणवरून येथे खरेदीसाठी आलो आहोत.**

**-ज्योत्स्ना बाईत, ग्राहक**

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलतर्फे शालेय साहित्य आणि मिठाईचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिथे दान देण्याची सवय असते, तिथे संपत्तीची कमी नसते. आणि जिथे माणुसकीची शिकवण असते, तिथे माणसांची कमी नसते उलवे येथील रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ स्कुल च्या वतीने आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे व मिठाईचे वाटप करण्यात आले.

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल चे विद्यमान चेअरमेन व पनवेल महानगर पालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ह्या उपक्रमासाठी चिरनेर येथील श्री. स्वामी समर्थ शिक्षण प्रसारक मंडळचे प्राथमिक आश्रम शाळा यांची निवड करण्यात आली.

या वेळी शाळेच्या प्राचार्या मुक्ता खटावकर, संग्राम फोफेरकर, हर्षल फडके सर, मनीषा मोरे तसेच पालक सभेचे सदस्य राजेश इडा व सचिन तोमर व शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमात शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमधील विद्यार्थीगणांनी या उपक्रमात मोठ्या प्रमाणात सहभाग घेत जास्तीत जास्त शालेय उपयोगी वस्तू जमा करण्यात हातभार लावला. विद्यार्थ्यांच्या हस्ते आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. यावेळी विद्यार्त्यांच्या चेहऱ्यावर हास्य व आनंदाचे भाव होते. तसेच विद्यार्थ्यांना आश्रमातील विद्यार्थी मित्रांच्या परिस्थितीची जाणीवसुद्धा झाली.

आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी देखील त्यांच्या विशिष्ट शैलीत अतिशय सुंदर प्रकारे सर्वांना धन्यवाद म्हटले. अशा प्रकारे संपूर्ण उपक्रम अतिशय उत्साही व हृदयस्पर्शी वातावरणात झाला.



## निवडक

### आदिवासीवाडीत दिवाळी भेटवस्तूवाटप



**रोहे** : एम. बी. मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय धाटाव येथील एनएनएस विभागामार्फत सोमवारी (दि. ६) बारसोली आदिवासीवाडी येथील राजिप शाळेतील विद्यार्थ्यांना दीपावलीनिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. ३४ विद्यार्थ्यांना शाळेची बॅग, पाणी बॉटल, वही, पेन-पेन्सिल आदी वस्तूंचे वितरण केले. कार्यक्रमास एम. बी. मोरे फाउंडेशन संचालक अशोकराव मोरे, सदस्य संजय मोरे, दिनेश पाशीलकर, संकेत खेरटकर, मंदा वाघमारे, कल्पना मोरे, धाटाव ग्रुप ग्रामपंचायत सदस्य संतोष धुमाळ, मुख्याध्यापिका सोनाली राख, ग्रामस्थ उपस्थित होते. एम. बी. मोरे महिला महाविद्यालयाचे प्रा. नरेश घाग, एनएनएस विभाग प्रमुख प्रा. मयूर पाखर आणि ८० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

### चणेरा मार्गावर अपघात; तिघे जखमी



**रेवदंडा** : रेवदंडा-चणेरा मार्गावर खारी गावाजवळ डंपर व मिनिडोरच्या अपघातात तिघेजण गंभीर जखमी झाले. ही घटना सोमवारी रात्री ९.३० वा. च्या सुमारास घडली. याप्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. साळाव येथील सोहिल कासकर त्याच्या डंपरने डोलवी येथून जेएसडब्ल्यू कंपनीतील माल साळाव येथे नेत होता. रेवदंडा-चणेरा मार्गावर त्याने खारी गावाजवळ अंधारात डंपर उभा केला होता. सुरक्षेच्यादृष्टिने त्याने कोणतीही लाईट सुरु ठेवली नाही. अंधारात रस्त्यावरील डंपर न दिसल्यामुळे पाठीमागून येणाऱ्या मिनिडोअरची डंपरला जोरदार धडक लागली. यामध्ये आरे बुद्रुक येथील समिर शिंदे (वय ३७), उमाजी शिंदे (वय ४५), उज्वला शिंदे (वय ४२) हे तिघेजण गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर पनवेल येथील लाईफलाईन रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# दिवेआगार येथे विस्तारित सुपारी संशोधन केंद्र

## केंद्रासाठी दोन हेक्टर जमीन व पाच कोटी ६४ रुपये खर्चास मान्यता

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन आणि नजीकच्या तालुक्यामधील सुपारी हे अत्यंत महत्त्वाचे व व्यापारी तत्त्वावर घेण्यात येणारे नगदी बागायती पीक आहे. या पिकास प्रोत्साहन देण्यासाठी महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली अंतर्गत सुपारी संशोधन (विस्तारित) केंद्र निर्माण करण्याची मागणी केली होती. त्याच्या प्रयत्नांमुळे श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगार येथे दोन हेक्टर जमिनीवर विस्तारित केंद्रास शासनाने मान्यता दिली आहे तसेच पाच कोटी ६४ लाख रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.




सुपारी संशोधन विस्तारित केंद्राबाबत कृषि मंत्री धनंजय मुंडे यांचे अध्यक्षतेखाली व महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत बैठक झाली होती. या बैठकीत डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत दिवेआगार येथे सुपारी संशोधन केंद्राच्या विस्तारीकरणाला मान्यता देण्यात आली.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत दिवेआगार येथील सुपारी संशोधन केंद्र निर्मितीमुळे सुपारी पिकावरील संशोधनास चालना मिळेल. सुपारीच्या बुटक्या, तसेच, दर्जेदार आणि अधिक उत्पादन देणाऱ्या जाती विकसित करण्यासाठी प्रयत्न केले जातील. याबरोबरच दिवेआगार, श्रीवर्धन परिसराचे हवामान आणि जमीन विचारात घेऊन अधिक उत्पादन व आर्थिक नफा मिळवून देणाऱ्या पिकाची आंतर पीक पद्धती विकसित करण्यासाठी संशोधन कार्य केले जाणार आहे.

या परिसरामध्ये होणारी सुपारीही वैशिष्टपूर्ण असून भौगोलिक मानांकनास पात्र आहे. या केंद्रामुळे रोजगार निर्मिती होऊन शेती उत्पन्नातही वाढ होऊन परिसराच्या विकासाला गती मिळणार आहे.

## रायगडात डिसेंबरमध्ये राष्ट्रीय लोकअदालत

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये ९ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती न्यायाधिश तथा सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमोल शिंदे यांनी दिली.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये सर्व न्यायालयात प्रलंबित असलेले दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी अपिले मोटार अपघात प्रकरणे, विवाहविषयक प्रलंबित प्रकरणे, तसेच ग्रामपंचायतकडील घरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात येतात.

लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, तसेच जास्तीत जास्त नागरिकांनी अदालतीचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा व सत्र न्यायाधिश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ए. एस. राजदेकर यांनी केले आहे.

## अलिबाग येथे उद्योजकांसाठी आज कार्यशाळा


### उद्योग संचालनालयामार्फत एमएसएमई विकासाकरिता उपक्रम

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सुक्ष्म, मध्यम आणि लघु उद्योग (एमएसएमई) क्षेत्रासंदर्भात बुधवारी (दि. ८) अलिबाग येथे आयजीएनआयटीई महाराष्ट्र या विषयावरील कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या हस्ते होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात उद्योजकांसाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्योग संचालनालयामार्फत राज्य आणि केंद्र सरकारची धोरणे आणि उपक्रम याबाबत जागरुकता



वाढविण्यासाठी उद्योजकांसाठी भागधारकांसोबत होणाऱ्या या कार्यशाळेत रायगड जिल्ह्यातील सुमारे २०० उद्योजक उपस्थित राहणार आहेत.

राज्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या एमएसएमई क्षेत्रावर अधिक भर देऊन त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, राज्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक करुन रोजगार, स्वयंरोजगार संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करणेसाठी तसेच उद्योगाच्या विकासाकरीता राज्य तसेच केंद्र शासनाचे विविध विभाग त्यांचे उपक्रम व योजना उद्योग संचालनालयामार्फत राज्यात राबवत आहेत.

सर्व योजनांची माहिती उद्योजकांना एकाच व्यासपीठावर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सर्व विभागांच्या सहकार्याने एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

कार्यशाळेसाठी सुक्ष्म, लघु, मध्यम उपक्रम घटक, निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नव उद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी सहकारी संस्था व उत्पादक, प्रक्रीया उत्पादक, केंद्र व राज्य शासनाचे तसेच संबंधित उपक्रमाचे अधिकारी, जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, निर्यातीसंबंधी कामकाज करणारे घटक, संशोधक, बँक इत्यादींना आमंत्रित करण्यात आलेले आहे, असे महाव्यवस्थापक तथा सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, रायगड अलिबाग यांनी कळविले आहे.

# अलिबाग बीच शोचा शानदार शुभारंभ

## आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते उद्घाटन

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर आयोजित अलिबाग बीच शोचे रविवारी (दि. ५) शानदार उद्घाटन झाले. आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून या संगीतमय सोहळ्याची सुरुवात झाली. स्थानिक कलाकारांनी नृत्य, गायनाने उपस्थितांची मने जिंकली, तर प्रसिद्ध आगरी हास्यकलाकार जॉनी रावत यांनी या सोहळ्याची रंगत वाढवली.

अलिबागमध्ये दर शनिवार-रविवारी लाखो पर्यटक येत असतात. आलेल्या पर्यटकांना जास्तीत जास्त आनंद मिळवून देण्याकरिता 'आरटी' फाउंडेशनतर्फे दर शनिवार, रविवारी सायंकाळी अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर ही सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी मिळणार आहे.

या उपक्रमाची सुरुवात रविवारी मराठी रंगभूमी दिनी




दिमाखदार सोहळ्याने झाली.

आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आला.

या वेळी आरसीएफ कंपनीचे जनरल मॅनेजर संजीव हरळीकर, आरसीएफ कंपनीचे जनसंपर्क अधिकारी संतोष वझे, कामगार नेते दिपक रानवडे, हर्षल पाटील, अर्जुन पाटील, ज्येष्ठ वकील ॲड. विलास नाईक, दत्ता ढवळे, कार्यक्रमाचे आयोजक राजन वेलकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनीही या कार्यक्रमाला हजेरी लावली.

स्थानिक गायक, नृत्यकलाकारांनी आपल्या कलेचे उत्कृष्ट सादरीकरण करत उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली, तर प्रसिद्ध आगरी हास्यकलाकार जॉनी रावत यांनी उपस्थितांमध्ये हास्याची लहर उठवली.

सूत्रसंचालक प्रतिम सुतार आणि योगेश पवार यांनी कार्यक्रम रंगतदार केला. समुद्रकिनाऱ्यावर रंगलेल्या या सोहळ्याला प्रेक्षकांनी प्रतिसाद देत, भरभरून दाद दिली.

या उपक्रमाद्वारे स्थानिक संस्कृती जपताना स्थानिक कलाकारांच्या कलागुणांना वाव दिला जाणार आहे, तसेच देशाच्या कानाकोपर्यातून येणाऱ्या पर्यटकांना त्यांची कला सादर करण्याकरिता खुला मंच उपलब्ध करून दिला जाणार आहे.

## भातसई ग्रामपंचायत प्रभाग ३मध्ये शिवसेनेचे उमेदवार विजयी

**नागोठणे : बातमीदार**

रोहा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत भातसईची सार्वत्रिक निवडणूक अतिशय शांततेत झाली. या निवडणुकीत शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांचा करिश्मा दिसला असून प्रभाग क्र. ३चे शिवसेनेचे अधिकृत उमेदवार धीरज नरेश खरिवले, गुलाब पवार व पुजा खरिवले हे तीनही उमेदवार विजयी झाले.

विजयीउमेदवार धीरज खरिवले हे खडकआळीतील रहिवाशी वृतपत्र विक्रेते राजेंद्र जोशी यांचे जावई असून या विजयामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. धीरज खरिवले यांचे ग्रामस्थांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## ट्रॉपिकाना हॉटेलमध्ये विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील मुशेत येथील पंचतारांकित ट्रॉपिकाना हॉटेलमधील तरण तालाव सफाईचे काम करीत असताना मुशेत येथील तरुणाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. प्रणय विजय जरंडे (वय २२) असे या तरुणाचे नाव आहे.

सोमवारी (दि. ६) ही दुर्घटना घडली. तरुणाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याचे समजताच ग्रामस्थ आक्रमक झाले. मांडवा पोलीस प्रशासनाला समजताच फौजफाटा घेऊन पोलीस घटनास्थळी दाखल झाले. प्रणयसोबत काम करणाऱ्या तरुणांनी त्या टाकीमध्ये यापूर्वीही शॉक लागत असल्याचे वारंवार व्यवस्थापनाला सांगितले होते, परंतु असे असतानाही हॉटेलच्या व्यवस्थापनाने काम करण्यास भाग पाडले. व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळेच प्रणयचा मृत्यू झाला, असे ग्रामस्थांचे म्हणणे होते.

ग्रामस्थांच्या मागण्या मान्य करण्यासाठी व्यवस्थापनाने १५ दिवसांचा वेळ मागितला होता, परंतु ग्रामस्थांनी त्यांना दोन दिवसांची मुदत दिली. दोषींवर कडक कारवाई करण्याचे आश्वासन पोलिसांनी दिले. त्यामुळे ग्रामस्थ शांत झाले.

# हरवलेली वृद्ध महिला नातेवाईकांच्या ताब्यात

### माणगाव पोलिसांचे मानले आभार

**माणगाव : प्रतिनिधी**

पाचगाव (ता. जिंतूर, जि. परभणी) येथील हरविलेली वयोवृद्ध महिला माणगावात सापडली. पोलिसांनी तातडीने या महिलेची चौकशी करून तिला मंगळवारी (दि. ७) तिच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी हवालदार पवार यांना एक वयोवृद्ध महिला रस्त्याच्या बाजूला झोपलेली आहे, असा फोन आला. त्यानंतर पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी उपनिरीक्षक आघाव, हवालदार पवार व कॉन्स्टेबल निवास साबळे यांना घटनास्थळी पाठवून त्या महिलेस पोलीस ठाणे येथे आणून महिलेकडे सखोल चौकशी पोलिसांनी केली.



या महिलेचे नाव तुळशीबाई कचरू आव्हाड (रा. पाचगाव, ता. जिंतूर, जि. परभणी) असे असल्याचे समजले. त्यानुसार संबंधित पोलीस ठाण्याकडे माणगाव पोलिसांनी संपर्क साधला असता महिलेची मिसिंग तक्रार दाखल असल्याचे समजल्यावर त्यांच्या नातेवाईकांना माहिती देण्यात आली.

त्यानंतर तिचे नातेवाईक माणिक शंकरराव वाघमारे हे मंगळवारी माणगाव पोलीस ठाणे येथे येऊन तुळसाबाई कचरू आव्हाड यांना त्यांच्या ताब्यात देण्यात आले.


माणगाव व जिंतूर-परभणी येथील पोलिसांनी केलेल्या सहकार्याबद्दल महिलेच्या नातेवाईकांनी पोलिसांचे आभार मानले.

## माथेरानची मिनीट्रेन ठरतेय पर्यटकांचे प्रमुख आकर्षण

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरान या पर्यटनस्थळावरील अबालवृद्धांची मने जिंकणारी तसेच त्यांच्या पर्यटनाला मनसोक्त आनंद देणारी मिनीट्रेन पर्यटकांचे प्रमुख आकर्षण बनले आहे. नेरळ-माथेरान मिनीट्रेन सुरू झाल्यापासून पर्यटनाची मांदियाळी पहावयास मिळत आहे. यादरम्यान पर्यटकांना भेट स्वरूपात तिकीट दरात बदल केले आहेत.

१९०७पासून मिनीट्रेन पर्यटकांच्या सेवेत आली. या दरम्यान मिनीट्रेनमध्ये आमूलाग्र बदल झाले. त्या काळी वाफेचे इंजिन, बोग्यांचा आकार वेगळा होता. त्यामध्ये मध्यरेल्वेने आमूलाग्र बदल करीत नॅरोगेजवर अबालवृद्धांना झुकझुक गाडी म्हणून प्रसिद्ध झाली. युनेस्कोनेही मिनीट्रेन



हेरिटेजसाठी नामांकित केले होते. त्यामुळे भारतीय रेल्वेला जगतिक यशाच्या शिखरावर नेण्यासाठी माथेरान मिनीट्रेन महत्त्वपूर्ण काम बजावत आहे.

मागील काही वर्षांपूर्वी झालेल्या छोट्या अपघातामुळे मिनीट्रेन सुरक्षेच्या कारणास्तव बंद करण्यात आली. तीन वर्षांनंतर मध्य रेल्वेने मिनीट्रेन दिमाखात रुळावर आणली आणि पर्यटकांनीही त्याला भरभरून प्रतिसाद दिला. यावर्षी ४ नोव्हेंबराला नेरळ-माथेरान मिनीट्रेन सुरू झाली. पर्यटकांना निसर्गाचा आनंद धावत्या मिनीट्रेनमधून देण्यासाठी मध्यरेल्वेने बदल केले. यामध्ये विस्टाडोम बोगीचा समावेश केला आहे.

परिवारासाठी वेगळा सलून विभाग केला आहे. प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणी सफेद काचा लावून त्यातूनसुद्धा पर्यटक निसर्गाचा आनंद लुटू शकतात. डिझेलवर चालणारी मिनीट्रेन नागमोडी वळणे घेत, जंगल सफर करीत, दरीखोऱ्यातून पर्यटकांना आत्मिक आनंद देऊन जाते.

# बांगलादेशाचा रोमहर्षक विजय

## श्रीलंका संघ विश्वचषक स्पर्धेतून बाहेर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत सोमवारी झालेल्या सामन्यात बांगलादेशने श्रीलंकेचा तीन विकेट राखून पराभव केला. या पराभवासह श्रीलंकेचा संघ उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने ४९.३ षटकांत २७९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात बांगलादेशने ४१.१ षटकांत सात गडी गमावून २८२ धावा करून सामना जिंकला.

बांगलादेश आणि इंग्लंड आधीच उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडले होते. आता श्रीलंकाही अधिकृतपणे अंतिम चारच्या शर्यतीतून बाहेर आहे. श्रीलंकेचा सध्याच्या स्पर्धेतील हा सहावा पराभव आहे. विश्वचषकाच्या इतिहासात बांगलादेशने प्रथमच श्रीलंकेचा पराभव केला आहे. श्रीलंकेकडून चरित असलंकाने १०५ चेंडूत १०८ धावांची उत्कृष्ट शतकी खेळी केली, तर बांगलादेशकडून तनझिम हसनने गोलंदाजीत तीन बळी घेतले. याशिवाय शाकिब अल हसन आणि शोरीफुल इस्लाम यांना प्रत्येकी दोन गडी बाद केले.

बांगलादेशने २८० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नझमुल हसन शांतोने ९० आणि शाकिब अल हसनने ८२ धावा केल्या. श्रीलंकेच्या गोलंदाजांनी मेहनत घेतली असली तरी मधल्या षटकांमध्ये शाकिब आणि शांतो यांच्यात झालेल्या १६९ धावांच्या भागीदारीने सामन्याचे चित्र बदलले.

या सामन्यात पुन्हा एकदा दिलशान मधुशंकाने श्रीलंकेसाठी सर्वाधिक तीन विकेट घेतल्या, तर महिश तिक्षाना आणि अँजेलो मॅथ्यूज यांना प्रत्येकी दोन गडी बाद केले.



### अँजेलो मॅथ्यूजच्या विकेटवरून वाद

सामन्यादरम्यान श्रीलंकेचा अनुभवी फलंदाज अँजेलो मॅथ्यूजला 'टाईम आऊट' करण्यात आले. यावरून वाद निर्माण झाला आहे.

२५व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर सदीरा समरविक्रमा बाद झाल्यानंतर अँजेलो मॅथ्यूज फलंदाजीला आला. त्याने चुकीचे हेल्मेट आणल्याने राखीव खेळाडूला दुसरे हेल्मेट आणण्यास सांगितले. त्यामुळे पंच आणि बांगलादेशी खेळाडूंना प्रतीक्षा करावी लागली. बांगलादेशचा कर्णधार शाकिब-उल-हसनने श्रीलंकन संघ वेळकाढूपण करीत असल्याची तक्रार केली. यानंतर पंचांनी मॅथ्यूजला आऊट दिले. मॅथ्यूजने शाकिबशी संवाद साधला, मात्र शाकिबने अपील मागे घेतले नाही. त्यानंतर मॅथ्यूज रागाने पॅव्हेलियनमध्ये परतला व त्याने संताप व्यक्त केला.

# 'सीकेटी'च्या समीक्षा पाटीलचे तलवारबाजी स्पर्धेमध्ये यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील समीक्षा संतोष पाटील हिने गोंदियात झालेल्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत यश प्राप्त केले आहे. राज्य क्रीडा युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद गोंदियाद्वारे ही स्पर्धा झाली.



या स्पर्धेत समीक्षा पाटील हिने तलवारबाजीच्या फाईल प्रकारामध्ये द्वितीय, तर सेबर प्रकारात तृतीय क्रमांक मिळवला. या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी समीक्षाचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# सानेगाव आदिवासी विकास विभाग प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धांना सुरुवात



**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यातील सानेगाव आदिवासी विकास विभाग प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धांना शासकीय आश्रमशाळा सानेगाव येथे सुरुवात झाली. या वेळी पेण प्रकल्पातील प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांनी आदिवासी विकास विभाग अंतर्गत होणाऱ्या क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन केले.

उद्घाटन समारंभास सहाय्यक प्रकल्प अधिकारी सतीश शेरमकर, प्रदीप सोलसकर, सानेगाव आश्रमशाळा मुख्याध्यापक मधुकर फसाळे, माजी विद्यार्थी रोहिणी भुजाडा, लेखाधिकारी पवार, विस्तार अधिकारी ज्योती वाघ, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मोतीराम लेंडी, मुख्याध्यापक मागाडे, वाकडी शाळा मुख्याध्यापिका पाटील, मुख्याध्यापक नाईक, कोळघर मुख्याध्यापक उत्तम पाटील, आश्रम शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव पुढे म्हणाल्या की, या वर्षी प्रकल्पाने केंद्र स्तरावर सुरुवातीला स्पर्धा घेतल्याने आता जे खेळाडू आहेत त्यांचे ते चांगला खेळ करतील. राष्ट्रीय खेलो इंडिया स्पर्धेत ओडिशातील भुवनेश्वर येथे पेण प्रकल्पातील भालिवडी आश्रमशाळेची विद्यार्थिनी रोहिणी भुजाडा हिने धावण्याच्या शर्यतीत सहभाग घेतला. रोहिणीला यासाठी आमंत्रित केले. त्याचे कारण म्हणजे तिचा आदर्श आदिवासी आश्रमशाळेतील इतर विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद पाटील यांनी केले.

प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेत सानेगाव, पिंगळस सावरई व वाकडी केंद्रातील आठशे विद्यार्थी सहभागी झाले आहेत. त्यांच्या जेवणाची, राहण्याची व आरोग्याची व्यवस्था सानेगाव आश्रम शाळेतील मुख्याध्यापक मधुकर फसाळे यांनी केली आहे.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील खो-खोमध्ये महाराष्ट्राचे दोन्ही संघ उपांत्य फेरीत

**फोंडा : वृत्तसंस्था**

गोव्यातील फोंडा येथील मल्टीपर्पज मैदानावर सुरू असलेल्या ३७व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत अपेक्षेप्रमाणे महाराष्ट्राच्या पुरुष व महिला खो-खो संघांनी गटातील तिनही सामन्यांत सहज विजय मिळवत उपांत्य फेरीत दिमाखदार प्रवेश केला आहे.



महिलांच्या गटातील शेवटच्या सामन्यात महाराष्ट्राने गुजरातचा ४८-२४ असा २४ गुणांनी पराभव करीत गटात प्रथम स्थान राखले. महाराष्ट्राकडून प्रियांका भोपीने ३.४० मि. संरक्षण करीत दोन गुण मिळवले. पूजा फरगडेने आक्रमणाची चमक दाखवत १० गुण मिळवले. किरण शिंदेने २.३० मि. संरक्षण करीत दोन गुण मिळवले. संपदा मोरेने २ मि. संरक्षण करीत सहा गुण मिळवले. गुजरात संघाकडून किरण १.२० मि. आणि १.१० मि. संरक्षण केले, तर गोपीने १.३०, १.२० मि. संरक्षण करीत दोन गुण मिळवले.

पुरुष गटात महाराष्ट्राने शेवटच्या साखळी सामन्यात आंध्र प्रदेशवर ७४-३२ असा ४२ गुणांनी सहज विजय मिळवला असला तरी सामन्याला प्रारंभ जोशात झाला. महाराष्ट्राने धारदार आक्रमण करीत आंध्रचे २६ गुणांची कमाई करताना सामना एकतर्फी केला. फैजन पठाणने १.१० मि. संरक्षण करीत १६ गुणांची नोंद केली. त्याला साथ देत रामजी कश्यपने १.१०, १.०५ मि. संरक्षण करताना १२ गुण मिळवले. ऋषिकेश मुरचवडेने आठ गुण मिळवले, तर अक्षय मासाळने १.२० मि. संरक्षण करताना सहा गुण वसूल केले. आंध्र प्रदेशकडून पी.नरसय्याने १.०० मि. संरक्षण करीत सहा गुण मिळवले. सिवा रेड्डीने १.२० मि. संरक्षणाचा खेळ करीत आक्रमणात सहा गुण मिळवले.

## बांगलादेश संघाचा कर्णधार शाकिब वर्ल्डकपमधून 'आऊट'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बांगलादेशचा कर्णधार शाकिब-अल-हसन विश्वचषक स्पर्धेतून बाहेर झाला आहे. श्रीलंकेविरुद्ध फलंदाजी करताना त्याच्या बोटाला दुखापत झाली. त्यामुळे तो बांगलादेशचा शेवटचा साखळी सामना असलेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी लढतीला मुकणार आहे.

श्रीलंकाविरुद्ध झालेल्या सामन्यानंतर एक्स-रेमध्ये त्याच्या बोटाला दुखापत झाल्याची पुष्टी केली, ज्यामुळे तो ११ नोव्हेंबर रोजी पुण्यात बांगलादेश विरुद्ध ऑस्ट्रेलिया सामन्यातून बाहेर पडला आहे. राष्ट्रीय संघाचे फिजिओ बेजेदुल इस्लाम खान यांनी दुखापतीबाबत अधिक माहिती दिली. ते म्हणाले, शाकिबला बांगलादेश डावाच्या सुरुवातीला डाव्या हाताच्या बोटाला दुखापत झाली होती, परंतु त्याने सपोर्टिव्ह टेप आणि वेदनाशामक औषध घेत फलंदाजी सुरू ठेवली. सामन्यानंतर त्याचा दिल्लीत तत्काळ एक्स-रे करण्यात आला ज्यात त्याच्या डाव्या बोटाच्या मध्यभागी फ्रॅक्चर झाल्याची पुष्टी झाली आहे. दुखापतीतून सावरण्यासाठी तीन ते चार आठवडे लागतील अशी माहिती देण्यात आली आहे. तो लवकरात लवकर बरा व्हावा यासाठी तो बांगलादेशला रवाना होईल.

# खराब कामगिरीनंतर श्रीलंका क्रिकेट बोर्ड बरखास्त

**कोलंबो : वृत्तसंस्था**

वनडे विश्वचषकातील निराशाजनक कामगिरीनंतर श्रीलंका क्रिकेट बोर्ड बरखास्त करण्यात आले आहे. श्रीलंकेच्या क्रीडा मंत्रालयाने ही कारवाई केली. यासोबतच क्रीडा मंत्रालयाने अंतरिम क्रिकेट समितीदेखील स्थापन केली आहे. या समितीची जबाबदारी श्रीलंकेचा माजी कर्णधार अर्जुन रणतुंगा याच्याकडे सोपवण्यात आली आहे.

भारतीय संघाकडून ३०२ धावांनी दारूण पराभवाचा सामना करावा लागल्यानंतर श्रीलंका क्रिकेट बोर्डाविरोधात निदर्शने सुरू झाली होती. श्रीलंकेचे चाहते बोर्डाच्या कॅम्पसबाहेर शम्मी सिल्वा यांच्या नेतृत्वाखालील बोर्डातील सदस्यांना हटवण्याची मागणी करीत होते.

दरम्यान, विश्वचषकातील खराब कामगिरीनंतर श्रीलंकन क्रिकेट बोर्डावरील भ्रष्टाचारापासून मॅच फिक्सिंगपर्यंतचे अनेक जुने आरोपही चर्चेत आले होते. हे पाहता श्रीलंकेच्या क्रीडा मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे. क्रीडामंत्री रणसिंघे यांनी पत्राच्या माध्यमातून सांगितले की, श्रीलंका क्रिकेट बोर्ड सध्या खेळाडूंच्या शिस्तभंगाच्या समस्या, व्यवस्थापनातील भ्रष्टाचार, आर्थिक अनियमितता आणि मॅच फिक्सिंगच्या आरोपांनी वेढले आहे. मी यावर एवढेच सांगतो की, केवळ सुशासनाची तत्त्वे प्रस्थापित करण्यासाठी अंतरिम उपाययोजना केल्या जात आहेत.

याआधीही रणसिंगे यांनी बोर्डातील भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी समिती स्थापन केली होती, मात्र आयसीसीने याला राजकीय हस्तक्षेप असल्याचे म्हटले होते. आता मात्र आयसीसीने अद्याप याबद्दल काहीही भाष्य केलेले नाही.

### निराशाजनक कामगिरी

विश्वचषकात आठपैकी सहा सामने गमावल्याने श्रीलंकेचा संघ उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर गेला आहे. गुणतालिकेत तो नवव्या स्थानावर आहे. श्रीलंकेला दक्षिण आफ्रिकेने १०२ धावांनी, पाकिस्तानने सहा गडी राखून, ऑस्ट्रेलियाने पाच गडी राखून, अफगाणिस्तानने सात गडी राखून, भारताने ३०२ धावांनी आणि बांगलादेशने सात गडी राखून पराभूत केले.

## लेजेंड्स लीग क्रिकेटची ट्रॉफी 'वंदे भारत'ने करणार प्रवास

**रोहे : प्रतिनिधी**

लेजेंड्स लीग क्रिकेटने भारतीय रेल्वेसोबत राष्ट्रीय मोहिमेची घोषणा केली आहे. लेजेंड्स लीग क्रिकेटची प्रतिष्ठित ट्रॉफी ८ नोव्हेंबरपासून वंदे भारत एक्स्प्रेसने प्रवास करणार आहे. ही ट्रॉफी देशभरातील १७ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये दिग्गजांसह फिरेल. अशा प्रकारचा हा पहिलाच अनुभव आहे.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, आम्ही वंदे भारतवर लिजेंड्स लीग क्रिकेट आणि दिग्गज खेळाडूंचे स्वागत करतो तसेच देशभरातील खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी या अविश्वसनीय प्रवासाची वाट पाहत आहोत. ८ नोव्हेंबरपासून ही मोहीम सुरू होणार असून १६ मार्गांपैकी नवी दिल्ली ते उना पहिली मोहीम असेल. १५ दिवसांचा हा प्रवास असेल.

# सहा मिनिटे उशिरा येऊनही गांगुली 'टाईम आऊट' झाला नव्हता!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील साखळी सामन्यात बांगलादेशविरुद्ध श्रीलंकेचा फलंदाज अँजेलो मॅथ्यूजला 'टाईम आऊट' घोषित करण्यात आले. आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच एखादा फलंदाज अशा प्रकारे बाद झाला. त्यामुळे आता अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, आता १६ वर्ष जुने प्रकरण समोर आले आहे, ज्यात सौरव गांगुली टाईम आऊट होण्यापासून वाचला होता.




सन २००७मध्ये केपटाऊनमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तिसऱ्या कसोटी सामन्यादरम्यान भारताने एक विकेट गमावली आणि पुढचा फलंदाज सचिन तेंडुलकरला खेळपट्टीबाहेर वेळ घालवल्यामुळे मैदानात उतरू दिले गेले नाही आणि व्हीव्हीएस लक्ष्मण आंघोळ करीत होता. तेव्हा फलंदाजीला येण्याची जबाबदारी सौरव गांगुलीवर होती. त्या वेळी गांगुली त्याच्या ट्रॅकसूटमध्ये होता.

या विशिष्ट परिस्थितीत गांगुलीने फलंदाजीला येण्यासाठी वेळ मर्यादा तीन मिनिटांनी ओलांडली असली तरी तत्कालीन दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार ग्रॅमी स्मिथने अपील न करण्याचा निर्णय घेतला आणि गांगुलीने फलंदाजीसाठी येण्याची संयमाने वाट पाहिली. त्या वेळी गांगुली सहा मिनिटे उशिरा फलंदाजीला आला होता, मात्र मॅथ्यूजची घटना आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पहिलीच घटना आहे, तर प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये फलंदाजांचा टाईम आऊट होण्याच्या सहा घटना घडल्या आहेत.

### काय आहे नियम?

नियमावलीनुसार एखादा फलंदाज बाद झाल्यानंतर किंवा दुखापतग्रस्त झाल्यामुळे बाहेर गेल्यानंतर पुढच्या तीन मिनिटांत पुढच्या फलंदाजाने मैदानात थेट क्रीजवर येऊन फलंदाजी करण्यासाठी तयार राहायला हवे. जर यादरम्यान अतिरिक्त वेळेची मागणी पंचांच्या परवानगीने किंवा संमतीने करण्यात आली असेल, तर ते विचारात घेतले जाते, मात्र तसे नसल्यास तीन मिनिटांच्या आत फलंदाज सर्व तयारी करून चेंडू खेळण्यासाठी क्रीझवर उपस्थित असायला हवा.

जीवेत् शरदः शतम्!

विवेक लोंढे

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
दर्शन पाटील

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com